
अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.२६ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १४९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## महाराष्ट्रातील अनेक पोलीस अधिकारी बढतीच्या आदेशाच्या प्रतिक्षेत

**मुंबई** : अनेक वर्ष सेवा केल्यानंतर नियमांप्रमाणे मिळणाऱ्या बढतीसाठी राज्यातील पोलिसांना बढतीसाठी प्रतिक्षा करावी लागत आहे. काहींना तर निवृत्तीच्या दिवशीच प्रमोशन मिळाले. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२२ मध्ये जवळपास १%५ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची बढती करण्यात आली. त्यानुसार त्यांना सहायक पोलिस आयुक्त पदी बढती मिळणे अपेक्षित होते. मात्र, या बढतीच्या आदेशावर चार महिन्यानंतरही कोणतीही कार्यवाही झाली नाही. या दरम्यानच्या कालावधीत १९९१-९२ बॅचचे अधिकारी असलेल्या ५ ते ७ वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना एसीपी म्हणून बढती देण्यात आली. मात्र, हे अधिकारी त्याच दिवशी निवृत्त झाले. एबीपी न्यूजशी बोलताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, सेवानिवृत्तीच्या दिवशी पदोन्नती मिळणे खूप विचित्र वाटते. पोलिसांच्या विभागीय पदोन्नती समितीनेत्यांच्या पदोन्नतीला अनेक महिन्यांपूर्वी मान्यता दिली आहे.




# लग्नाला विरोध झाल्याने गळ्याला लावली दोरी

## युगुलाने एकत्र गळफास घेत संपवली प्यारवाली लव्हस्टोरी

**सुराज्य/सोलापूर**

**मामाच्या गावाला गेल्यानंतर एका तरुणाबरोबर प्रेम जडले.. प्रेम बहरत असताना त्याची वाच्यता झाली.. त्यानंतर घरच्या लोकांनी बैठका घेतल्या.. लग्नास शेवटी विरोध झाला.. त्यातून निराशा पदरी आली.. एकत्र जीवन जगता येत नाही म्हणून एकत्र मरण्याचा निर्णय घेतला.. एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या दोघांनी एकमेकांच्या डोळ्यासमोर एकाच झाडाच्या फांदीला गळफास घेऊन आपली प्यारवाली लव्हस्टोरी एकत्रच संपवली. ही घटना सोलापूर शहरानजीक असलेल्या कवठे गावातील गणेशनगर तांडा येथे शनिवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.**



सुरज पुंडलिक चव्हाण (वय २५ रा. खुनेश्वर ता.मोहोळ) आणि लक्ष्मी शिवाजी तांबे (वय १७ रा. सोरेगाव) अशी मयत झालेल्या प्रेमीयुगुलाची नावे आहेत. शनिवारी सकाळी ११ च्या सुमारास त्यांचे मृतदेह कवठे (ता.उत्तर सोलापूर)येथील गणेशनगर तांडा नजीक कॅनॉलजवळच्या लतिकाबाई पाटील यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाच्या एकाच फांदीला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. याची माहिती मिळताच सलगर वस्तीच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोघांचे मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे शवविच्छेदनासाठी पाठवून दिले. रुग्णालयात दोन्हीकडच्या लोकांनी गर्दी केली होती. काहीजण हळहळ करीत होते. सायंकाळी शवविच्छेदन झाल्यानंतर दोघांचे मृतदेह ज्यांच्या त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात अंत्यसंस्कारासाठी देण्यात आले.या घटनेची नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली असून पुढील तपास हवालदार प्रमोद गायकवाड करीत आहेत.

### लक्ष्मीच्या मिसिंगची तक्रार

इकडे लक्ष्मी तांबे ही दुपारी कॉलेजला जाते म्हणून गेली ती परतली नव्हती. तिच्या घरच्या लोकांनी शोध घेतला आणि पोलिसात मिसिंगची तक्रार देण्यासही गेले होते. शनिवारी सकाळी दोघांचे मृतदेह शेतातील लिंबाच्या झाडाच्या एकाच फांदीला गळफास घेतल्याच्या अवस्थेत दिसून आले. लक्ष्मी हिने ओढणीने तर सुरज चव्हाण याने सुती दोरीने गळफास घेतला. झाडाखाली सुरज चव्हाण याची दुचाकी आणि लक्ष्मी तांबे हिची कॉलेजची बॅग आढळून आली. त्यावरून मयताची ओळख पटली.

### मामाची गावी जुळले प्रेम

लक्ष्मी तांबे ही जुळे सोलापुरातील एका कॉलेजमध्ये ११ वी इयत्तेत शिकत होती. तिचे मामा खुनेश्वर (ता.मोहोळ) येथे राहण्यास आहेत. वर्षापूर्वी लक्ष्मी ही मामाच्या गावाला गेल्यानंतर तिचे सुरज चव्हाण या तरुणाबरोबर प्रेमसंबंध जुळले होते. याची वाच्यता झाल्यानंतर दोघांनी लग्न करणार असल्याचे घरी सांगितले. मुलीच्या आई-वडिलांचा प्रेमप्रकरण आणि लग्नास विरोध होता. मात्र दोघे ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.मुलीच्या घरच्या लोकांनी खुनेश्वर येथे जाऊन बैठका घेऊन विवाहास विरोध दर्शविला होता. तसेच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विवाहाचे बघू असे म्हणून मुलीची समजूत काढली होती.त्यामुळे निराश झालेल्या प्रेमीयुगुलाने या जगाचा निरोप घेण्याचे ठरवून हे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले.

### लग्नाला म्हणून गेला अन् गळफास घेतला

मयत सुरज कुंडलिक चव्हाण हा वेल्डिंगचे काम करीत होता. त्याच्या घरची परिस्थिती बेताची आहे. शुक्रवारी सकाळी त्याने आपल्या मित्राचे लग्न सोलापुरात आहे, असे वडिलांना सांगून २०० रुपये मागून घेतले. सकाळी ११ च्या सुमारास वडिलांची मोटारसायकल घेऊन गेला तो परतला नाही. त्याचे वडील त्याचा शोध घेत होते. त्याच्या मित्रांकडेही चौकशी केली होती. मात्र त्याच्याविषयी काहीच कळले नव्हते. जेव्हा पोलिसांकडून समजले; तेव्हा घरच्यांनी हंबरडाच फोडला.

## बबनदादांचा निर्णय तो आमचा निर्णय; पाटलांनी भाजप प्रवेशाचा चेंडू आ.शिंदेंकडे टोलवला

**सोलापूर** : माढ्याचे आमदार बबनराव शिंदे हे आमचे मेहुणे आहेत. माझी बहीण त्यांना दिली आहे. त्यांचा निर्णय तो आमचा निर्णय, असे म्हणत त्यांनी भाजप प्रवेशाचा चेंडू आ. बबनदादा शिंदे यांच्याकडे टोलावला. त्यामुळे शिंदे काय निर्णय घेणार, याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

उपळाई खुर्द (ता. माढा) येथे आमदार बबनराव शिंदे यांची ग्रंथतुला करण्यात आली. त्या कार्यक्रमाला राजन पाटील उपस्थित होते. राजन पाटील यांनी भाजप प्रवेशाबाबत बोलताना जनता जो निर्णय घेईल, त्याबरोबर राहू, असे विधान केले होते. त्यासंदर्भात आमदार शिंदे यांनाही प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी त्यांनीही त्याबाबतीत योग्य वेळी, योग्य निर्णय करू,' असे संदिग्ध उत्तर दिले. यावेळी लागलीच पत्रकारांनी राजन पाटलांना प्रश्न विचारला त्यावर त्यांनी बबनराव शिंदे हे आमचे मेहुणे आहेत. माझी बहीण त्यांना दिली आहे. त्यांचा निर्णय तो आमचा निर्णय, असे म्हणत आणखीन गोंधळ वाढवला. दरम्यान, यावेळी आ. शिंदे यांनी रस्त्याच्या आणि २५/१५ च्या कामांना दिलेली स्थगिती सरकारने उठवावी, अशी मागणीही शिंदे यांनी केली.

### पाटलांना सुप्रिया सुळेंचा फोन?

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी नुकतीच माजी आमदार राजन पाटील यांच्या अनगर येथील निवासस्थानी भेट दिली. त्यांनी पाटलांना भाजप प्रवेशाची ऑफर दिली होती. सावंतांच्या भेटीनंतर राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा राजन पाटील यांना फोन आल्याची चर्चा रंगली होती. त्याबाबत पाटील यांनी मला सुप्रिया सुळे यांचा फोन आलेला नाही, असे स्पष्टपणे सांगितले.





आ.सत्यजित तांबे यांनी शनिवारी 'सुराज्य'ला भेट दिली. त्यावेळी त्यांचे स्वागत व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळ्ये यांनी केले. याप्रसंगी उपसंपादक विजय गायकवाड, अजित उंब्रजकर, मनोज कुलकर्णी, सुमित भोसले, विजयकुमार हत्तुरे, नितीन शिवशरण आदी.

## परिस्थिती पाहून योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ : आ.तांबे

**सोलापूर** : विधानपरिषद निवडणुकीत आपल्याला अनेकांची साथ मिळाली. त्यामुळे पुढील राजकीय भूमिका घेताना ज्यांनी मला साथ दिली, त्यांच्याबरोबर चर्चा करून आणि राजकीय परिस्थिती पाहून योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ, असे आ.सत्यजित तांबे यांनी सांगितले.

आ. तांबे शनिवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते, त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. आ. तांबे पुढे म्हणाले की, सध्या नवीन युवक राजकारणात येत आहेत. त्यांना आजचे शिव्याशापाचे राजकारण कधीच मान्य होणार नाही. ज्यांनी वेगळे स्वप्न दाखवत दिल्लीत सत्ता मिळवली, त्यांचे नगरसेवकही आज एकमेकांवर धावून जाताना सगळ्यांनी पाहिले आहे. त्यामुळे आजच्या युवकांनी राजकारणात कोणाचा आदर्श समोर ठेवायचा हा प्रश्न आहे. आज जातीपातीचे राजकारणही वाढले आहे, त्याला आपला विरोध आहे. मुळात जात ही संकल्पनाच आपल्याला मान्य नाही, असेही ते म्हणाले. नामांतरणाच्या मुद्यावर तांबे म्हणाले की, औरंगाबाद आणि उस्मानाबादचे नामांकर ण करण्यात आले हे स्वागतार्ह आहे. मात्र केवळ नाव बदलण्यारून शहराचा विकास होणार आहे का याचाही विचार करण्याची गोष्ट आहे.

यापूर्वी अनेक शहरांची नावे शासनाने बदलली आहेत, मात्र त्यानंतर तिथे वेगळे विकासाचे चित्र दिसले नाही. त्यामुळे विकासासाठी, रोजगारासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असेही आ. तांबे म्हणाले. पोटनिवडणुकीच्या विषयावर ते म्हणाले की, पिंपरी चिंचवड आणि कसबा या दोन्ही पोटनिवडणुकींची समीकरणे वेगळी आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दृष्टीने ही निवडणूक भाजप आणि महाआघाडीसाठी महत्त्वाची असणार आहे. मात्र या दोन्ही निकालाचा राज्याच्या राजकारणावर काही परिणाम होणार असल्याचे ते म्हणाले.

### सोनिया गांधींचे केले कौतूक

सोनिया गांधींनी राजकारणातून संन्यास जाहीर केला आहे. त्याबाबत तांबे म्हणाले की, त्यांची काँग्रेस पक्षासाठी ऐताहासिक काम केले आहे. त्यांच्या कार्याळात सलग १० वर्षे काँग्रेसची सत्ता आली. अन्नसुरक्षा कायदा त्यांनीच आणला. ते उत्तम प्रशासक होत्या. त्यांनी निवृत्ती घेतली याचे वाईट वाटते, असेही ते म्हणाले.

## मी मुख्यमंत्री आहे, सगळ्यांची खबर ठेवतो

### केजरीवाल-ठाकरेंच्या भेटीवरुन शिंदेंचा टोला

**मुंबई** : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीवर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टोला लगावला आहे. ''मी मुख्यमंत्री आहे. त्यामुळे सगळ्या गोष्टींची खबर ठेवतो. आम्ही त्यांना (उद्धव ठाकरे यांना) जवळून पाहिलं आहे. त्यामुळे त्यांना आम्ही ओळखतो'', असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.



शिवसेना आणि पक्षचिन्ह मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर ते म्हणाले, ''आम्हाला निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि पक्षचिन्ह दिले आहे. लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व असते. त्यांच्या संपत्तीवर आम्ही दावा केलेला नाही. आम्ही बाळासाहेबांच्या विचारांवर चालत आहोत. २०२४ मध्येही तुम्हीच मुख्यमंत्री असणार का? या प्रश्नाचे उत्तर देताना शिंदे म्हणाले, ''आता कुणाला मुख्यमंत्री करायचं हे जनतेच्या हातात असते. आम्ही काम करत आहोत. या पुढेही आम्ही काम करत राहू. कुणाला मुख्यमंत्री करायचं आणि कुणाला मुख्यमंत्री पदावरून हटवायचं हे सर्व जनताच ठरवत असते. आम्ही दिवस-रात्र एक करून काम करत आहोत. राज्यात मोठं-मोठे प्रकल्प उभारण्याचे काम आम्ही करत आहोत, असं ते म्हणाले.

## सोरेगावात तरुणाची गळफासाने आत्महत्या



**सोलापूर** : सोरेगाव येथील अंबिका नगरात राहणाऱ्या मल्लिकार्जुन ऊर्फ मल्लू पुंडलिक माने (वय २४) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. शुक्रवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास त्याने छताच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही.हवालदार म्हेत्रे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता ताक पण फुंकून प्यावे लागत आहे !

**कल्याण**
**113-56-240**

## सेवा, संघर्ष, बलिदान-सर्वप्रथम हिंदुस्थान... कॉंग्रेसचे नवे ब्रीद

### भारत जोडोने माझी खेळी आता अंतिम टप्प्यात : सोनिया गांधी

**सुराज्य/रायपूर**

छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे सुरू असलेल्या कॉंग्रेसच्या ८५ व्या राष्ट्रीय अधिवेशनाकडे देशातील राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे. शनिवारच्या दिवसाचे खास वैशिष्ट्य म्हणजे कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी कॉंग्रेस पक्षाची नवी घोषणा दिली. 'सेवा, संघर्ष, बलिदान - सर्वप्रथम हिंदुस्थान' हे पक्षाचे नवे ब्रीद असेल.पण देशभरातील कार्यकर्त्यांना हुरहुर वाटणारा एक प्रसंगही समोर आला. पक्षाच्या नेत्या व माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी आपल्या भाषणात सक्रिय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले. भारत जोडो यात्रेने माझी राजकीय खेळी आता अंतिम टप्प्यात आली आहे,असे भावनिक उद्गार त्यांनी काढताच अधिवेशनातील वातावरण एकदम स्तब्ध झाले. कॉंग्रेस नेत्यांना



संबोधित करताना खरगे म्हणाले, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी आणि राजीव यांच्या गौरवशाली वारशाचे आपण सर्वजण प्रतिनिधित्व करत आहोत. आज प्रत्येक कॉंग्रेसचा कार्यकर्ता, प्रत्येक देशवासीयाला पुढे जाऊन 'सेवा, संघर्ष आणि बलिदान सबसे पहले हिंदुस्तान' असा संदेश देईल. हीच आमची घोषणा असेल. आज देशाला त्याची गरज आहे, कारण भारत वेगळ्या कठीण काळातून जात आहे. आज मोदी सरकारच्या काळात गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढली आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, मागास, शेतकरी, मजुरांवर अत्याचार होत आहेत. त्यांच्या धोरणांमुळे शेतकरी, मजुरांना आत्महत्या करण्यास सरकारने भाग पाडले आहे. आज देशात नोटाबंदी आणि जीएसटीच्या चुकीच्या अंमलबजावणीमुळे १२ कोटी लोकांच्या नोकऱ्या गेल्या, तर दुसरीकडे करोडो लोक दारिद्र्यरेषेखाली आले. गंगा नदी कोविडमध्ये हजारो मृतदेहांनी वाहत होती. कोरोनाच्या काळात देशातील जनतेला डॉक्टर आणि औषधे मिळाली नाहीत. राहुल गांधींनी अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली. कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत आता वेगळे वातावरण पसरले आहे.

### घटनेत मोठे बदल

कॉंग्रेसच्या घटनेत मोठे बदल करण्यात आले. यामध्ये, अनुसूचित जाती, आदिवासी, अल्पसंख्याक आणि मागासवर्गीयांसाठी एआयसीसी प्रतिनिधी आणि सर्व पदांच्या ५० टक्के जागा राखीव असतील. ५० टक्के पदे ही ५० वर्षांखालील व्यक्तींकडे असतील. १ जानेवारी २०२५ पासून कॉंग्रेसमध्ये कागदोपत्री सदस्यत्व नसेल, फक्त डिजिटल सदस्यत्व ग्राह्य धरले जाईल. त्याचबरोबर तृतीय लिंगाबद्दलही तरतूद असणार आहे.फॉर्ममध्ये आई आणि पत्नीचेही नाव लिहिले जाणार आहे. ब्लॉक, जिल्हा आणि राज्य पातळीवर जिथे जिथे कॉंग्रेसचे निवडून आलेले सदस्य असतील, तिथे ते सर्व प्रतिनिधी असतील. सदस्यत्वापासून सक्षमीकरणापर्यंत आता सहा पीसीसी प्रतिनिधी सदस्यांवर एक एआयसीसी सदस्य निवडला जाईल. आतापर्यंत आठ जणांची निवड झाली होती. एआयसीसी सदस्यांची संख्या १२४० वरून १६५३ पर्यंत वाढेल.



# आरटीओच्या सतर्कतेमुळे दोघांचे प्राण वाचले

**सोलापूर :** सोलापूरच्या उप-प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या पथकाने वेळीच सतर्कता दाखवली व मदत कार्य हाती घेतले. त्यामुळे ट्रक अपघातातील दोघांचे प्राण वाचले. आरटीओचे अधिकारी खाकी वर्दीतच असतात. पोलीस आणि आरटीओचा विभाग नेहमीच टीकेचा धनी होत असतो परंतु खाकीवर्दीतही दया- माणुसकी असते याचे सुरम्य दर्शन बार्शीच्या तालुकावासियांना घडले.

झाले असे की, सोलापूरच्या आरटीओ कार्यालयातील राहुल खंदारे, प्रियंका माने हे वाहन निरीक्षक यांच्यासह धीरज डोईफोडे वाहन चालक शिवाजी गायकडवाड हे शनिवार दि.१८ फेब्रुवारी रोजी सोलापूरहून बार्शीकडे कर्तव्य बजावण्यासाठी निघाले होते. त्यांची गाडी पानगावजवळ आल्यानंतर एक ट्रक(एम एच १२ सीजे ११३८) रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पडल्याचे त्यांना दिसले. त्यांनी गाडी थांबवली व ट्रकजवळ गेल्यानंतर दोघेजण त्यात अडकल्याचे दिसून आले. शेजारच्या लोकांना त्यांनी बोलावून घेतले.


समोरच्या काचा फोडून जाधव व मोरे यांना बाहेर काढले. खंदारे व माने यांनी लागलीच रूग्णवाहिका बोलावून त्या दोघांना पानगावच्या प्राथमिक आरोग्य हलवले. त्यानंतर बार्शीला पाठवले. वेळीच उपचार मिळाल्याने त्या दोघांचे प्राण वाचले.

# ८०० किलो कांदा विकूनही व्यापाऱ्याला उलट पैसे देण्याची शेतकऱ्यावर वेळ

## कांद्याच्या दरात घसरण शेतकऱ्याला मिळाला मायनस १ रुपया

**सोलापूर :** कांद्याचे दर वाढल्यावर सर्वसामान्य जनतेचे बजेट कोलमडते अशी ओरड केली जाते. डोळ्यात पाणी आलेचे चित्र रंगविले जाते.परंतु काही दिवसांपासून कांद्याची शेती करणाऱ्या बळीराजावर संक्रांत आल्याचे चित्र राज्यभरात पाहायला मिळत आहे. कांद्याने शेतकऱ्यांचे वांदे केले आहेत. १७ फेब्रुवारी रोजी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत एका शेतकऱ्यास ५०० किलो कांदा विकल्यावर अवघ्या २ रुपयांचा चेक देण्यात आला होता.

ही घटना ताजी असताना पुन्हा एका शेतकऱ्याच्या बाबत असाच प्रकार घडला आहे. या शेतकऱ्याने ८२५ किलो कांदा विकून काहीही रक्कम हाती आली नाही. हमाली, तोलाई, गाडी भाडे याचे सर्व पैसे वजा करून शून्य रुपये हाती आले. उलट शेतकऱ्यालाच त्या व्यापाऱ्यांला १ रूपया देण्याची वेळ आली. त्यामुळे शेतकऱ्याला एक रुपया देऊन रिकाम्या हाती माघारी परतावे लागले. या कांद्याच्या बिलाची पट्टी सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली आहे. १ फेब्रुवारी रोजी बंडू भांगे या शेतकऱ्याने सोलापूर कृषी बाजार समितीत जवळपास ८२५ किलो कांदा विकला. परंतु दर घसरल्याने कांद्याला योग्य भाव मिळाला नाही आणि सर्व पैसे वजा करून शेतकऱ्याच्या हाती काहीही आले नाही.




### ■ शेतकऱ्याला दमडीही नाही

सोलापूर जिल्ह्यातील दाउतपूर येथील बंडू भांगे या शेतकऱ्याने १ फेब्रुवारी रोजी एस.एन जावळे या कांदा व्यापाऱ्याकडे ८२५ किलो कांदा विक्रीसाठी आणला होता. या कांद्याला प्रतिक्विंटल १०० रुपये दर मिळाला. म्हणजेच ८२५ किलो कांद्याची एकूण रक्कम झाली ८२५ रुपये. हमाली झाली ६५.१८ रुपये, तोलाई झाली ३८.७८ रुपये, इतर हमाली झाली २५.५० रुपये, मोटार भाडे झाले ६९७ रुपये असा एकूण ८२६ रुपये खर्च झाला. त्यामुळे शेतकऱ्याला उलट व्यापाऱ्याला एक रुपया द्यावा लागला आणि रिकाम्या हाती माघारी परतावे लागले.

### ■ प्रतिक्विंटल ७५० रुपयांची घसरण

सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकरी संघटना कडून करण्यात आली आहे. किरकोळ मार्केट मध्ये आजदेखील कांदा १५ ते २० रुपये दराने विकला जातो. कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व्यापारी एक रुपया किंवा दोन रुपये प्रतिकिलो लिलाव करत शेतकरी वर्गाची थट्टा करत आहेत. राज्य शासनाने त्वरित शेतकऱ्यांना अनुदान देण्याची व्यवस्था करावी. अन्यथा शेतकऱ्यांना सोबत घेऊन संघटना तीव्र आंदोलन करणार असा इशारा देण्यात आला.

### ■ कांद्याची आवक वाढल्याने दरात घसरण

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत दोन महिन्यांपासून कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सोलापुरवरुन कांदा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, चेन्नई, तेलंगणा आदी भागात निर्यात केला जातो. या राज्यातील व्यापारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत, उत्तम दर्जाच्या कांद्याची मागणी करतात. सर्वच शेतकऱ्यांकडे उत्तम दर्जाचा कांदा असतो असे नाही. काही कांदा, बारीक किंवा पापुद्रे निघालेला कांदा देखील असतो. कांद्याची वाढती आवक,निर्यात कमी, यामुळे कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे.

# पेन्शनचा प्रश्न सोडविणाऱ्यांना यापुढे मतदान

## महसुल कर्मचाऱ्यांच्या परिषेदत निर्धार

**सुराज्य/सोलापूर**




गेल्या अनेक वर्षांपासून रखडत ठेवलेल्या जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न सरकारने तत्काळ सोडवावा, अन्यथा आगामी काळात पराभवाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असे ठणकावत यापुढे पेन्शनचा प्रश्न सोडविणाऱ्या पक्षालाच मतदान करण्याचा निर्धार सरकारी कर्मचाऱ्यांनी केला.

शनिवारी शिवछत्रपती रंगभवन सभागृहात शासकीय व निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या महसूल कर्मचारी संघटनेचे नेते शंतनू गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मेळाव्यात विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी सरकारला अल्टिमेटम दिला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कर्मचारी संघटनेचे प्रदेश पातळीवरील नेते चरणसिंह टाक उपस्थित होते. या मेळाव्यात कर्मचारी संघटना कृती समितीचे नेते अशोक इंदापूरे, प्रशांत लंबे, विवेक लिंगराज, सुरेश पवार, मरेप्पा फंदीलोलू, बापू सदाफुले, मंडेपू बाली, सायमन गड्डू, जनार्दन शिंदे, तजमुल मुत्तवली, अविनाश गोडसे, रविराज खडाखडे, विजय भांगे, राजू कैय्यावाले, ज्योतिराम शिंदे, सोनाली केत, आशा माने, चंद्रकांत चलवादी, रघुनाथ बनसोडे, देवीदास शिंदे, राजीव साळुंखे, मनिष सुरवसे आदी विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर, श्री सिध्देश्वर प्रशाला, जिल्हा परिषदमार्गे शिवछत्रपती रंगभवन सभागृहापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत शहर व जिल्हयातील विविध विभागातील शेकडो कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

एकच मिशन जुनी पेन्शन, जो पेन्शनकी बात करेगा, वही महाराष्ट्र में राज करेगा अशा घोषणा कर्मचाऱ्यांनी पदयात्रेदरम्यान दिल्या. मेळाव्याच्या सुरूवातीला दीपप्रज्वलन करून दिवंगत नेते र.ग. कर्णिक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या मेळाव्यात गायकवाड, इंदापुरे, पवार यांच्यासह ज्योती कलुबर्मे, त्रिंबक इंदापूरकर, ज्योतिराम शिंदे, स्वाती चोपडे यांनी मनोगत व्यक्त करून राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही जुनी पेन्शन योजना लागू व्हावी अशी मागणी केली. यासाठी महाराष्ट्रातील सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन वोट फॉर ओपीएस आंदोलन पूर्ण ताकदीने उभारणे गरजेचे असल्याचे म्हटले.



# सिध्देश्वरनगर येथे तलवारीने मारहाण

**सुराज्य/सोलापूर**

एमआयडीसी परिसरातील सिद्धेश्वरनगर येथे किरकोळ भांडणातून तलवारीने केलेल्या मारहाणीत लक्ष्मण राजेंद्र गुत्तीकोंडा (वय २९) आणि लावण्या गुत्तीकोंडा असे दोघे जखमी झाले. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. घरा पाठीमागे महिलांच्या तक्रारी चालू होत्या. त्यावेळी गौस पठाण याने दोघांना मारहाण केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे

### ■ वेळापूर पोलीस अधिकाऱ्यांची मध्यस्थी

# ३५ वर्षापासून बंद असलेला रस्ता चालू

**वेळापूर :** माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील तांदुळवाडी-खोरेवस्ती हा रस्ता गेली ३५ वर्षे पिलीव-पंढरपूर रोडपासून बंद होता. प्रत्येक निवडणुकीत हा रस्ता प्रचाराचा प्रमुख मुद्दा असायचा आणि निवडणूक झाली की पुढारी परत त्यावर बोलत नव्हते. या सर्वांना शेतकरी कंटाळले होते. अखेर पोलिसांच्या मध्यस्थीने हा रस्ता खुला करण्यात आला.



शेतकऱ्यांनीच खोरेवस्ती रोडवरील हा रस्ता हा नकाशातील आहे तो खुला करावा यासाठी तहसीलदाराकडे कायदेशीर पणे रस्ता मागणी अर्ज दाखल केला होता. त्याचा निकालही शेतकऱ्यांच्या बाजूने लागला होता. तीन चार महिने सामजंसपणे रस्ता खुला करण्यासाठी भरपूर प्रयन्त झाले तरीही यांत कोणीही लक्ष घालेना म्हणून संबधित प्लॉटधारकांना रोडवरील शेतकऱ्यांनी अनेकदा विनवण्या करून रस्ता मागितला परंतु या सर्वांचे एकमत होऊन रस्ता काही चालू करता आला नाही शेवटी शेतकऱ्यांनी पोलिस अधिकारी यांची मदत घेऊन रस्ता खुला करण्यासाठी वेळापूर पोलिस स्टेशन गाठले. निलेश बागाव आणि ठाणे अंमलदार सहा.पोलिस उपनिरीक्षक संजय रेगुडे यांच्याकडे हा विषय मांडला. सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली मग त्यांनी सुवर्ण मध्य काढून सकारात्मक निर्णय घ्यायला शेतकरी आणि प्लॉटधारकांना लावला.

रस्ता करण्यासाठी प्रमुख सहकार्य धनाजी चव्हाण,दत्ता कदम, सज्जन कदम, कल्याण गायकवाड, बापू बाबर, तात्यासो सुरवसे तसेच प्रशांत निंबाळकर आणि मिलिंद शिंदे यांचे त्याचबरोबर पोलिस अधिकारी निलेश बागाव आणि ठाणे अंमलदार सहा.पोलिस उपनिरीक्षक संजय रेगुडे यांनी कायदेशीररीत्या मध्यस्थी करून दोघांना ही विश्वासात घेऊन रस्ता चालू करून दिला.

यावेळी हणमंत धनवडे,महादेव धनवडे, बाळासाहेब भोसले, बाळासाहेब राजगुडे, किसन शिंदे, भास्कर केदार, प्रल्हाद भोसले, दशरथ मिले, जोतिराम शिंदे, अमोल राऊत आदी उपस्थित होते.

# शिंगडगाव प्रशालेत सायकल वाटप

**सोलापूर :** नवजीवन ग्रामविकास तरुण मंडळ संचलित, स्वामी विवेकानंद हायस्कूल, शिंगडगाव येथे झुआरी सिमेंट कंपनीकडून सामाजिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशाने प्रशालेतील गरीब व होतकरुन मुलींना १० सायकलींचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी पंचायत समिती द. सोलापूरचे गट शिक्षणाधिकारी पाथरुटकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वळसंग केंद्राचे केंद्रप्रमुख देविदास वाघमोडे, झुआरी उद्योग समूह औज (आहेरवाडी) प्लांट हेड दीपक कक्र, अमोल जाधव, कौस्तुभ काळे, रुद्रमणी उपस्थित होते. सरपंच शंकर चव्हाण, उपसरपंच बिभिषण पाटील, संस्थेचे संचालक श्रीशैल भिमणवरु तंटामुक्त अध्यक्ष ईरय्या स्वामी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळे पतसंस्थेचे संचालक सुभाष भिमणवरु यांनी स्वागत केले. यावेळी ५वी ते १०वी च्या दहा विद्यार्थिनींना त्यांच्या प ालकांच्या उपस्थितीत सायकल वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन विजय बाळगी यांनी केले. यावेळी प्रशालेतील शिक्षक व शिक्षिका व सेवक गावकरी उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे आभार मुख्याध्यापक सुभाष भिमणवरु यांनी मानले.

# मोटरसायकल पळवली

**सोलापूर :** राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एमएच.१३.सीजी.७५९७ ही दि.२३ ते २४ फेब्रुवारी दरम्यान चोरट्याने चोरून नेले आहे.अशा आशयाची फिर्याद गिरीधर विठ्ठल निलुर (वय-३१,रा.क्षिरालींग नगर,मुळेगाव रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

# मंद्रूप प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा ठाकरे गटात प्रवेश

## अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार

**सुराज्य/सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूपसह परिसरातील प्रहार जनशक्ती पक्षाच्या आजी-माजी पदाधिका-यांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केला आहे. जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी प्रवेशाच्या वेळी केला.

सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ यांच्या आदेशानुसार व, माजी आ. रतिकांत पाटील व जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश झाला आहे. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे गट) जिल्हा प्रमुखपदी निवड झाल्यानंतर अमर पाटील यांनी दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात संपर्क दौरे वाढविला आहे. पक्ष वाढीसाठी ते प्रयत्न करीत आहेत. त्यांचा एक भाग म्हणून हा प्रवेश घेण्यात आला ठाकरे गटामध्ये प्रवेश करणाऱ्यामध्ये मंद्रूप येथील दक्षिण सोलापूर प्रहार संघटनेचे कार्याध्यक्ष सिध्दाराम काळे, शहराध्यक्ष उस्मान नदाफ, शाखा प्रमुख हाजीमलंग नदाफ यांच्यासह दिगंबर मरिआईवाले प्रहारचे कार्यकर्त्यांचा ठाकरे गटामध्ये प्रवेश केला.



माजी आ. रतिकांत पाटील व जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी त्यांच्या गळयात भगवे उपरणे घालून स्वागत केले. पक्ष वाढीसाठी आम्ही प्रयत्न करू अशी ग्वाही प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी दिला. यावेळी जिल्हा उपप्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, संतोष केंगनाळकर, संतोष पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले, दक्षिण विधासभा संघटक राजू बिराजदार, राहूल घंदुरे, संतोष घोडके, शिवसेना तालुकाप्रमुख योगिराज पाटील, युवासेना तालुकाप्रमुख धर्मराज बगले, जिल्हा उपप्रमुख आकाश गंगदे ,निंगराज हळ्ळे तालुका उपप्रमुख आप्पासाहेब व्हनमाने, तालुका समन्वयक संतोष बरूरे, विभाग प्रमुख संदीप मेंडगुदले, युवा सेनेचे खंडू सलगर व नांदणीचे उपसरपंच बिरू वरवटे आदी उपस्थित होते.

# मुंढेवाडी येथे दोन होड्या फोडून पाच ब्रास वाळू जप्त

**पंढरपूर :** मुंडेवाडी (ता. पंढरपूर) येथील भीमा नदीच्या पात्रातील वाळू उपसा व वाळू वाहतूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दोन होड्या फोडून पाच ब्रास वाळू जप्त करण्याची कारवाई पोलिस व महसूल प्रशासनाने केली आहे. मुंडेवाडी येथील खटकाळे वस्ती इथे विनापरवाना वाळू उत्खनन होत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी याबाबत महसूल प्रशासनाला माहिती दिली.

तसेच पोलिस व महसूल करमाचाऱ्यांचे पथक त्याठिकाणी कारवाई साठी पाठवले. यावेळी नदी पात्रात दोन होड्यामध्ये पाच ब्रास वाळू मिळून आल्या. यामुळे त्यांनी दोन होड्या जेसीबीच्या साहाय्याने फोडल्या. तसेच पाच ब्रास वाळू जप्त करून शासकीय गोदामात आणुन ठेवली आहे. ही कारवाई पो.ना. सुहास देशमुख, पोना. सचिन आटपाडकर व कासेगाव मंडल अधिकारी बाळासाहेब मोरे, तलाठी आर आर गुटाळ, आंबे कोतवाल महादेव खिल्लारे, रोपळे कोतवाल प्रल्हाद खरे यांनी केली आहे.

# विहिरीत पडल्याने महिला जखमी

**सोलापूर :** टाकळी (ता.दक्षिण सोलापूर) येथे विहिरीत जाऊन विद्युत मोटर चालू करताना पाय घसरून पाण्यात पडल्याने सुजाता सुरेश साबळे (वय ४१) ही महिला जखमी झाली. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# विविध मागण्यांसाठी ठाकरे गटाचा आंदोलनाचा इशारा

**सुराज्य/अक्कलकोट**

तडवळ व्हि पी शुगरने चालू वर्षीच्या २५०० रूपये पर्यंतचा दुसऱ्या हप्ता लवकरात लवकर शेतकऱ्यांना द्यावा व तालुक्यातील नवीन रस्ता मध्ये गैरव्यवहार ठेकेदारला काळ्या यादीत टाकावे व संबधीत शासकीय अधिकाऱ्यांवर करावाई व्हावी व नवीन रस्ता मंजूर करावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल,या संदर्भात बाळासाहेब ठाकरे शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांना लेखी निवेदन देण्यात आले.



तडवळ व्ही.पी शुगर प्रा. लि. येथे शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे यांच्या नेतृत्वाखाली ३ वेळा आंदोलन केल्यानंतर पहिले उचल २२०० रु व एफआरपी नुसार २५०० रु पर्यंत भाव देण्याचे व्हीपी शुगर ने मान्य केले होते. जिल्ह्यातील सिध्देश्वर शुगर कारखाना ने २६००/- रु पेक्षा जास्त भाव देण्याचे हमी दिलेले आहे.

स्वामी समर्थ शुगर कारखान्याने २४००/- रु पेक्षा जास्त भाव देण्याचे मान्य केले आहे. व्हीपी शुगर मात्र शेतकऱ्यांची दिशाभूल व फसवणूक करीत आहेत. येत्या १५ दिवसात व्हीपी शुगर ने शेतकऱ्यांचे पैसे दिले नाही तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जनआंदोलन छेडण्यात येईल व यात होणाऱ्या सर्व नुकसानीस कारखानदार जबाबदार असतील याची नोंद घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे. याशिवाय अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे ते मंगरूळ, तडवळ ते सुलेरजवळगे, कलहिप्परगा ते हैद्रा, तडवळ ते व्हीपी शुगर रस्ता कळहिप्परगी ते हंद्राळ रस्ते खराब झाले आहेत. हे रस्ते त्वरित पूर्ण दुरुस्ती करावी व हलगर्जीपणा केलेल्या आधिकाऱ्यांवरती योग्य ती कारवाई व्हावी आंदेवाडी, देवीकवठा, आंदेवाडी ते कुंभारवस्ती, करजगी ते कलहिप्परगा, कलहिप्परगा ते शावळ, कुंभारवस्ती हिळळी पर्यंत रस्ता त्वरीत मंजुरी करावा आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी तालुका संघटक सोपान निकते, युवा सेना तालुका युवा अधिकारी विश्वानाथ कोगनुरे, शहर प्रमुख मल्लिनाथ खुबा, सिध्दू गुब्याड राजु गुणापुरे, तालुका उपप्रमुख धनराज चव्हाण, विभाग प्रमुख उमेश साळुंखे, शेतकरी सेना बसवराज पुजारी, अल्प संख्याक सेना अफसर मकानदार, उपशहर प्रमुख शेडम, मुरगेंद्र मुंदीनकेरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीचा निर्णय

# समितीमार्फत देण्यात आलेल्या पावती पुस्तकांचा वापर करा

**सुराज्य/सोलापूर**

परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात व्यवसाय करणारे परवानाधारक आडते, व्यापाऱ्यांना, शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी-विक्री करताना बाजार समितीने प्रमाणित केलेल्या तसेच समितीमार्फत देण्यात आलेल्या पावती पुस्तकांचा वापर करणे बंधनकारक केलेले आहे.

शेतमालाची खरेदी-विक्री करताना बाजार समितीने दिलेल्या खरेदी-विक्री पावती पुस्तका व्यतिरिक्त अथवा बाजार समितीने प्रमाणित कलेल्या पावती पुस्तकांच्या व्यतिरिक्त अन्य पावती पुस्तकांचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास बाजार समिती मार्फत संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे बाजार समितीने स्पष्ट केले आहे.



शेतकऱ्यांनी त्यांचा शेतमाल विक्री केल्यावर संबंधीत व्यापारी आडते, व्यापाऱ्यांच्याकडून बाजार समितीने प्रमाणित केलेल्या पावती पुस्तकातीलच पावती देत आहेत किंवा नाही याची खात्री करावी तसेच जर एखादा व्यापारी हा शेतमाल खरेदी विक्रीबाबतची पावती देण्यास टाळाटाळ करीत असल्यास अथवा बाजार समितीने दिलेल्या अथवा प्रमाणित केलेल्या पावत्या देत नसेल तर त्याबाबत बाजार समितीकडे लेखी तक्रार करण्यात यावी. पावती व्यतिरिक्त प्रमाणित नसलेल्या शेतमाल खरेदी विक्रि च्या पावत्या देवून शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पावत्या आग्रहाने मागून घ्याव्यात. तसेच भविष्यात शासनाकडून अनुदान अथवा शेतमालावर कोणतीही शासकिय मदत जाहीर झाल्यास प्रमाणित पावत्याचं ग्राह्य धरण्यात येतील. प्रमाणित नसलेल्या पावत्यांमुळे शेतकरी शासकीय लाभापासून वंचीत राहिल्यास त्यास बाजार समिती जबाबदार राहणार नाही, असे आवाहन बाजार समितीच्या सचिवांनी केले आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# तांबेच्या संपूर्ण दौऱ्यात काँग्रेसचे पदाधिकारी झळकले

## कार्यकर्त्यांनी केला सत्कार आणि दिल्या शुभेच्छाही

**सोलापूर** : नाशिक पदवीधर मतदारसंघातील आ. सत्यजित तांबे हे शनिवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांच्या या दिवसभराच्या संपूर्ण दौऱ्यात काँग्रेसचे अनेक प्रमुख पदाधिकारी त्यांच्यासोबत दिसले. अनेक पदाधिकाऱ्यांनी तांबे यांचा सत्कारही केला. अपक्ष निवडणूक लढवल्यामुळे तांबे यांचे काँग्रेसमधून निलंबन करण्यात आले आहे. मात्र तरीही सोलापुरात मात्र काँग्रेसचे पदाधिकारी त्यांच्यासोबत राहिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

आ. सत्यजित तांबे हे शुक्रवारी रात्री सोलापुरात आले. सकाळी त्यांचे स्वागत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केले. तांबे यांच्यासोबत त्यांचे कट्टर समर्थक सुमित भोसले, नितीन शिवशरणही संपूर्ण दौऱ्यात सोबत होते.





गाणगापूर, अक्कलकोट येथील देवदर्शन झाल्यानंतर तांबे यांनी पदाधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. दरम्यान दुपारी तांबे यांचा सत्कार काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला. यावेळी माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अंबादास करगुळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव पंडित सातपुते, शहर मध्य अध्यक्ष वाहिद विजापुरे, दक्षिण विधानसभा सरचिटणीस सचिन वेर्णेकर, शहर मध्य विधानसभा माजी युवक अध्यक्ष योगेश मार्गम, नागेश म्याकल, युवक काँग्रेस सरचिटणीस श्रीनिवास परकीपडंला, युवा कार्यकर्ते अमर हळळी, शाहु सलगर, मनोहर मार्चला, देवा करगुळे आदी उपस्थित होते. तांबे यांचे काँग्रेसमधून निलंबन झाल्यानंतर त्यांचे समर्थक सुमित भोसले यांचेही पक्षातून निलंबन करण्यात आले होते. तर नितीन शिवशरण यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे ते दोघे तांबे यांच्यासोबत होते. दुसरीकडे काँग्रेसचे प्रवक्ते मनोज कुलकर्णी आणि वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांचे तांबेसोबत संपूर्ण दौऱ्यात असणे हे न उलगडणारे कोडे आहे.



## राऊत, बंदपट्टे यांचा सत्कार

**वेळापूर** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी भैय्या राऊत यांची निवड झाल्याबद्दल अकलूज शहराध्यक्ष म्हणून अनिल बंदपट्टे यांची निवड झाल्याबद्दल वेळापूर तालुका माळशिरस येथील गरुड बंगला येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी साजिदभाई सय्यद, शिवसेनेचे रामकृष्ण जाधव, आप्पा कांबळे तसेच मिलिंद मोरे, रामभाऊ वाघमोडे, अमोल पनासे आदी उपस्थित होते.



## गायकवाड वाडी जि.प.शाळेला वॉटर फिल्टर भेट

**मोडनिंब** : अविष्यत् ट्रस्ट ठाणे यांच्याकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गायकवाड वाडी येथील शाळेला वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. अविष्यत् ट्रस्ट यांच्यातर्फे भागवत पाटील यांनी शाळेकडे सोपवला. अरण ग्रामपंचायतीतर्फे पाण्याची टाकी देण्यात आली. यावेळी भागवत पाटील यांनी अविष्यत ट्रस्टच्या कार्याची ओळख करून दिली. यावेळी नवनाथ शिंदे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष शरद सावंत, उपाध्यक्षा भाग्यश्री गायकवाड, सर्जेराव गायकवाड, आप्पा गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य धनाजी सावंत, आश्विनी कदम, लतिका गायकवाड मुख्याध्यापिका सुनिता राडकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अभिजीत चवरे यांनी तर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ सावंत यांनी आभार मानले.



## वैरागमध्ये विविध योजनांचा जनजागर

**वैराग** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय तसेच जिल्हा माहिती कार्यालय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्या . संयुक्त विद्यमाने बार्शी तालुक्यात महात्मा फुले ग्रामीण विकास संस्थेच्या कला पथकाने प्रभावीपणे जनजागृती केली . उपळाई (ठोंगे ), खांडवी, पांगरी, उकडगांव, चिखर्डे, बार्शी शहर आणि वैराग या गावांमध्ये या कला पथकाने अनुसूचित जाती व विशेष घटक यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची माहिती दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना, आरोग्य व पशुसंवर्धन, वसतिगृहे, आश्रम शाळा, महिला व बालकल्याण, क्रीडाविषयक सुविधा, आण्णाभाऊ साठे नागरी सुविधा, घरकूल योजना , महिला बचत गट, लघूउद्योग, आंतरजातीय विवाह अशा अनेक योजनांची माहिती दिली. योजनांची देण्यासाठी विविध कला पथके नेमलेली आहेत.

## निधन वृत्त

### याकुब सय्यद



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील संग्राम दोस्ती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष याकुब सय्यद यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रल्हाद बाबर




**सांगोला** : सांगोला तालुक्यातील चोपडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक प्रल्हाद सिताराम बाबर गुरुजी यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, एक मुलगी असा परिवार आहे.

### शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

# सामुदायिक विवाह सोहळ्यात ७ जोडप्यांच्या बांधल्या रेशीमगाठी

**सुराज्य/अकलूज**

शिवकिर्ती युवा मंच व शिवतेजसिंह मोहिते-पाटील मित्र परिवाराच्या वतीने अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वधर्मीय समुदायीक विवाह सोहळ्यात ७ जोडप्यांच्या रेशीमगाठी बांधण्यात आल्या.



यामध्ये ४ दिव्यांग जोड्यापाचा समावेश आहे. अन्नपूर्णा सांस्कृतिक भवन, शिवतेजनगर अकलूज येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यास नव वधु-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, पुण्यकोटी आश्रम कर्नाटक चे वारलिंगेश्वर शिवाचार्यरू हे अवर्जुन उपस्थित होते.

विवाह सोहळ्याचे आयोजक निखील शिरसट, किरण गायकवाड, राजु काळे यांनी उद्योगमहर्षि स्व.उदयसिंह मोहिते-पाटील यांचा लोकसेवेचा वारसा घेवून शिवकिर्ती युवा मंचच्या माध्यमातून जनतेची सेवा अखंडीत पणे चालू ठेवला आहे.सोहळ्यातील जोडप्यांना लग्नातील पोषाख, संसारोपयोगी साहित्य, मंगळसुत्र प्रदान केले.

तसेच सर्व वऱ्हाडी मंडळीस भोजन व्यवस्था केली. विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी नाशिक सोनवणे, मोहन तिकोटे, अनिल उघडे, राहुल बोबडे, प्रकाश गायकवाड, सुरज जगदाळे, अजय निचळ, सुनिल खांडेकर, राहुल सातपुते, निशांत जगताप, अजय वाघेला, राहित पवार, आदम सय्यद, सौरभ कांबळे, आकाश धोत्रे, सौरभ पाटोळे, नितीन पवार, रोहित काळे, ऋषिकेश चव्हाण, रोहित गायकवाड, राहुल बनसोडे, कुमार वाघेला आदींनी परिश्रम घेतले.

## बँकेसमोर लावलेली मोटरसायकल लंपास

**सोलापूर** : हुतात्मा स्मृती मंदिरच्या बाजूला असलेली आयसीआयसीआय बँकेच्या समोर मोटरसायकल क्रमांक एमएच.१३. डीजे.७२५९ ही दि.१९ फेब्रुवारी रोजी हँडल लॉक करून ठेवली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. अशा आशयाची फिर्याद ऋतुराज बाळासाहेब जाधव (वय-२३, रा.मु.पो. मनगोळी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नदाफेक करीत आहेत.

## सिध्देश्वर वुमेन्स आणि उद्यम इनोव्हेशन यांच्यात सामंजस्य करार

**सोलापूर** : श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित श्री सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या उद्यम या इन्क्युबेशन सेंटर सोबत नुकतेच सामंजस्य करार करण्यात आला. सोलापूर जिल्हा व परिसरातील नवनवीन स्टार्टअप कल्पनांना प्रोत्साहन व मार्गदर्शन देणे, आणि त्यातून उद्योग उभारणी करण्यासाठी सहाय्य करणे हे या इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या सामंजस्य करारामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या नवनवीन कल्पनांचे प्रॉडक्ट मध्ये रूपांतरित करण्यासाठी उद्यम कडून सहकार्य व मार्गदर्शन विद्यार्थिनींच्या अंतिम वर्षातील प्रोजेक्ट्साठीचे मार्गदर्शन, महाविद्यालयात उद्यम कडून अनेक मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे आदींचा समावेश आहे आणि याचा येथील विद्यार्थिनींना एखाद्या प्रॉडक्टसाठी पेटंट मिळवणे आणि त्यातून स्टार्टअप उद्योजकता विकास करणे अशा गोष्टी शक्य होतील. विद्यापीठाच्या उद्यम इनोव्हेशन-इन्क्युबेशन सेलचे डायरेक्टर डॉ सचिन लड्डा म्हणाले कि, यशस्वी होण्यासाठी पैशाची नव्हे तर कल्पनाशक्तिची गरज असते. मुलींनी आपल्या शिक्षणानंतर ठराविक तास नोकरी करण्याच्या विचारसरणीच्या चौकटीमध्ये न अडकता विद्यार्थिनींनी व्यवसाय करावा, त्यासाठी उद्यम सर्वतोपरी मदत करते असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ टी.ए.चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचच्या ४२ विद्यार्थिनींची टीसीएस, सी.जी. आय., सॅनकी सोल्युशन्स, कॅप्जेमिनी आणि आय.बी.एम सारख्या कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली आहे.

## विद्यार्थ्यांनी कला गुणांनाही महत्व द्यावे : कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कलागुण आत्मसात करायला लावून त्यांचा सर्वांगीण विकास करायला वार्षिक स्नेहसंमेलन झालेच पाहिजे. आनंददायी शिक्षणाचा तो एक भाग असल्याचे मत कार्यक्रमाचे उद्घाटक युवा नेता सागरदादा कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी चे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे झाले.त्यावेळी कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी चपळगाव बीट विस्तार अधिकारी प्रशांत अरबाळे यांनी शाळेने शिक्षणाबरोबरच भावनिक सामाजिक विकासासाठी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. सरपंच लक्ष्मी अंकलगे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. उपसरपंच शबाना नदाफ यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले तर रंगमंच पूजन शिक्षण विस्तार अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष गौरीशंकर दोड्याळे हे होते.यावेळी व्यासपीठावर ग्रामपंचायत सदस्या निर्मला परशेट्टी, ललिता बन्ने, उज्वला गोविंदे, पंडित दोड्याळे, जावेद नदाफ, तंटामुक्त अध्यक्ष, सिद्धाराम निंबाणे, पोलीस पाटील सिकंदर नदाफ,वि का सेवा सोसायटी, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष, करीम नदाफ, माजी अध्यक्ष, मुलका नदाफ सदस्या इसरत नदाफ, गुडुमाबी नदाफ, प्रियंका बन्ने, संगिता गोविंदे, शशिकांत स्वामी, महेश येणगुरे,विद्यार्थी, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यांनी केले .प्रास्ताविक शिवशरण गोविंदे यांनी मानले.तर आभार प्रदर्शन तुकाराम जाधव यांनी केले.कार्यक्रमासाठी ईलाई नदाफ, सिद्धाराम अंकलगे, गुरुबसप्पा गोविंदे रेवणसिद्ध इटगळे, सोमनाथ स्वामी, राचय्या स्वामी, प्रमिला नागणसुरे, शौकत नदाफ, रामचंद्र गोविंदे, स्वाती कडलासकर, मंगल गोविंदे, ज्योती गोविंदे आदींनी परिश्रम घेतले.

# अत्यल्प मावेजाच्या नोटिशींची सामुदायिक होळी

## सुरत-चेन्नई हायवेला एक इंचही जमीन न देण्याचा केला निर्धार

**अकलूज** : सुरत चेन्नई महामार्गासाठी शेतकऱ्यांना उध्वस्त करणाऱ्या अत्यल्प मावेजाच्या नोटिसांची सामुदायिक होळी करण्यात आली. अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब मोरे हे होते. ग्रीन कॉरिडोर राष्ट्रीय महामार्गासाठी दिला जाणाऱ्या मावेजाची रक्कम एकरी पाच लाख आणि बागायत जमिनींसाठी सात लाख इतकी अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील या महामार्गासाठी प्रशासनाने रोवलेल्या खुंटी उखडून टाकून या महामार्गासाठी एक इंचही जमीन देऊ नये असे आवाहन भ्रमणध्वनीवरून खासदार राजू शेट्टी यांनी केले.



या बैठकीचे आयोजक शेतकरी नेते स्वामीनाथ हरवाळकर यांनी समृद्धी मार्ग किंवा बाजारभावाच्या पाचपट दर जाहीर केल्याशिवाय शेतकऱ्यांनी शासनाच्या नोटिसा घेऊ नये व बलिदानास सज्ज राहावे असे आवाहन केले. भाजपाच्या महिला अध्यक्ष सुरेखा होळीकट्टी यांनी याबाबत लवकरच नितीन गडकरी यांची अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना घेऊन न्याय मागणार असल्याचे सांगितले.

या बैठकीत सर्व शेतकऱ्यांनी भूसंपादनाला तीव्र विरोध करून शासनाचा धिक्कार केला.या बैठकीसाठी अक्कलकोट ग्रामीण व मैंदर्गी, नागनळी, मातनळी, कोनहल्ली, सिन्नर, हसापूर, चपळगाव चपळगाव वाडी, बोरेगाव, कुरनुर, दहिटणे, दहीटणेवाडी डोंबर जवळगे, सिंदखेड आणि अक्कलकोट तालुक्यातील सुरत चेन्नई ग्रीन फील्ड एक्सप्रेस हायवे बाधित शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दाखवून शासनाच्या या निर्णयाचा तीव्र विरोध केला. पुढच्या आठवड्यापासून तालुक्यात उग्र आंदोलन छेडणार असल्याचे बाळासाहेब मोरे यांनी सांगितले. या बैठकिस शेखर कुंभार, चेतन जाधव, सुभाष शिंदे, संजय जाधव, अमित काळे,अजय सुरवसे, वीरेश भंगरगी, जगदेवआप्पा कलमनी, मल्लिनाथ मैत्री, संजय सवळी, दीपक कदम, शंभुलिंग आकतनाळ, ज्ञानेश्वर पवार, नागनाथ सुलगडले आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-AUCTION NOTICE**

Notice for e-Auction sale of Dry Fly (20%) Ash at Parli TPS.
MAHAGENCO is looking for firms willing to purchase the Dry Fly Ash at Parli Thermal Power Station by way of e-auction sale.

| S.N. | Event | Schedule |
|---|---|---|
| 1. | Doc Uploading by Bidder | Start Date: 27.02.2023<br>Close Date: 05.03.2023 |
| 2. | Seller Evaluation Download | Start Date: 06.03.2023<br>Close Date: 15.03.2023 |
| 3. | Approving Bidders online by Seller before auction start | 16.03.2023 |

Key Contact Personnel & Contact details :

| | |
|---|---|
| Auctioneers for MSPGCL (for queries related to registration with e-auction portal, transfer of payments) | M/s. MSTC Ltd., Mumbai<br>• Miss Pranali Tel : 02235134240,<br>• Mr. S Yadav, Mobile : 8826562675, e-mail: syadav@mstcindia.co.in |
| Parli TPS (for queries related to site visit, material , contract execution, deliveries, invoices) | Garje S. K.<br>EE (Ash utilization cell)<br>Mob. No. 9822477588<br>mail:eeashutlparli@mahagenco.in |

Further details are available on www.mstcindia.co.in, www.mstcecommerce.com, www.mahagenco.co.in

Date of e-auction- 21.03.2023, Time-1400-1600

**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-AUCTION NOTICE**

Notice for e-Auction sale of Pond Ash at Parli TPS.
MAHAGENCO is looking for firms willing to purchase the Dry Fly Ash at Parli Thermal Power Station by way of e-auction sale.

| S.N. | Event | Schedule |
|---|---|---|
| 1. | Doc Uploading by Bidder | Start Date: 20.02.2023<br>Close Date: 26.02.2023 |
| 2. | Seller Evaluation Download | Start Date: 27.02.2023<br>Close Date: 05.03.2023 |
| 3. | Approving Bidders online by Seller before auction start | 07.03.2023 |

Key Contact Personnel & Contact details :

| | |
|---|---|
| Auctioneers for MSPGCL (for queries related to registration with e-auction portal, transfer of payments) | M/s. MSTC Ltd., Mumbai<br>• Miss Pranali Tel : 02235134240,<br>• Mr. S Yadav, Mobile : 8826562675, e-mail: syadav@mstcindia.co.in |
| Parli TPS (for queries related to site visit, material , contract execution, deliveries, invoices) | Garje S. K.<br>EE (Ash utilization cell)<br>Mob. No. 9822477588<br>mail:eeashutlparli@mahagenco.in |

Further details are available on www.mstcindia.co.in, www.mstcecommerce.com, www.mahagenco.co.in

Date of e-auction- 14.03.2023, Time-1400-1600


# शिक्षक अभियोग्यता परीक्षा शिक्षकांसाठी की बँकेतील क्लार्कसाठी?

## विद्यार्थ्यांचा टाहो..!

**सुराज्य/सोलापूर**

**२२ फेब्रुवारीपासून असलेले शिक्षक भरतीसाठी घेतली जाणारी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी ही शिक्षकासाठी आहे की बँकेत नोकरी करू इच्छिणाऱ्यांसाठी..! असा प्रश्न हजारो विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.**

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा २२ फेब्रुवारी ते ३ मार्च पर्यंत होत आहे. डिसेंबर २०१७ मध्ये राज्यात पहिल्यांदा शिक्षक अभियोग्यता परीक्षा घेण्यात आली होती. मात्र तात्कालीन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी जाहीर केलेले पदभरती अजून झालेली नाही. अजून ९३७ जागा रिक्त असतानासुद्धा पहिल्या परीक्षेत ज्यांना संधी मिळाली नाही अशा उमेदवारांना २०२३ च्या शिक्षक अभियोग्यता चाचणी संधी मिळणार या अपेक्षने राज्यातील लाखो विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी केली. मात्र प्रत्यक्षात उमेदवारांना पेपर पॅटर्न, परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम, आणि परीक्षेचे विचारण्यात आलेले प्रश्न नियमावली आणि आयबीपीएस कंपनी अशा अनेक गोष्टीवर प्रश्न उपस्थित करत आहेत.

राज्यभर परीक्षा केंद्रावर हजारो विद्यार्थी टेटची परीक्षा देण्यासाठी आले असता आयबीपीएस आणि शिक्षण विभागाच्या नावाने नाराजी चेहऱ्यावर दिसून येत आहे आणि परीक्षा संदर्भात आपली भावना व्यक्त करत आहेत. आतापर्यंत नेहमी बँकेचे परीक्षा घेणाऱ्या आयबीपीएस कंपनीला परीक्षेची जबाबदारी दिल्यामुळे हा गोंधळ झाला आहे. या परीक्षेत मराठी-हिंदी-भूगोल-सामान्य ज्ञान तसेच अध्यापनशास्त्र-मानसशास्त्र या अशा महत्त्वपूर्ण विषयांना कमी महत्त्व देऊन केवळ बुद्धिमत्ता आणि गणितावर भर देण्यात आला आहे.

२०० मार्क च पेपर वाचत असताना भरपूर वेळ जात आहे अनेक विद्यार्थ्यांचे किमान ६०ते ७० प्रश्न सोडवण्याच वेळ मिळत नाही. पेपर तयार करताना डी. एड आणि बी.एड च्या उमेदवारांचा विचार केला गेला नाही. किंवा अभ्यासक्रमाचा विचार केला गेला नाही.

### विद्यार्थ्यांची मते

मुळातच आम्ही संघटनेच्या वतीने परीक्षेचा कालावधी, अभ्यासक्रम, पेपर फी, याविषयी शिक्षण विभागशी चर्चा केली असता त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद आम्हाला मिळाला नाही. आमची वारंवार वेळ वाढवून देण्यासंदर्भात, अभ्यासक्रमाची कठीणपातळी कमी करण्यासंदर्भात मागणी असताना सुद्धा परीक्षा त्यांनी लवकरात लवकर घाई-गडबडी मध्ये घेण्याचा निर्णय घेतला त्याचा फटका आज लाखो विद्यार्थ्यांना बसत आहे. ही परीक्षा घाई गडबडत घेण्याचा एवढा अट्टाहास का केला गेला. त्याच्या पाठीमागे काही गोडबंगाल तर नाही ना असा संशय मनात निर्माण होत आहे, असे मत अनेक विद्यार्थी नोंदवत आहेत.

# हद्दवाढ भागात थकबाकीदारांवर पुन्हा कारवाई

सुराज्य/सोलापूर

**मिळकतकराची कोट्यवधी रुपयांची अद्यापही थकबाकी असल्याने महापालिका आयुक्तांच्या निर्देशावरून मालमत्ता कर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे वसुली आणि कारवाईत व्यस्त झाले आहेत. गेल्या दोन दिवसात शहरातील विविध भागात ५५ मोठ्या थकबाकीदारांवर कारवाई करण्यात येऊन २१ जणांच्या मिळकती सील तर ३४ मिळकतींमधील नळजोड तोडण्याची कारवाई करण्यात आली आहे.**



महापालिकेकडून एक लाखावरील १२०० हून अधिक थकबाकी मिळकतदारांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. यानंतर ५० हजारांवरील थकबाकी असलेल्या ९ हजार मिळकतदारांना मुदतीसह कर भरण्याच्या अथवा कारवाई करण्यात येण्यास संदर्भातील नोटीसा बजावल्या आहेत. या नोटिसांप्रमाणे मालमत्ता कर विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पथकाने कारवाई मोहीम सुरू केली आहे.

अभय योजना बंद झाल्यानंतर ते आजतागायत शहरातील साखरपेठ, उत्तर सदर बाजार, रविवार पेठ, कसबे सोलापूर, अक्कलकोट रोड, भवानी पेठ व इतर भागांमध्ये तर हद्दवाढ भागातील विडी घरकुल, होटगी रोड, नई जिंदगी परिसर आणि विविध पेठांमध्ये कारवाई मोहीम राबविली.

या मोहिमेत २१ मिळकती सील करण्यात आले. यामध्ये २ कारखाने, एक खाजगी कार्यालय, २ गोडावून, ६ गाळे, एक टेलर दुकान आणि इतर मिळकतींचा समावेश आहे याशिवाय ३४ थकबाकी मिळकतदारांचे नळजोड तोडण्यात आले आहेत. याबरोबरच या कालावधीत कारवाई मोहिमेचा दणका दाखवून ३ कोटी ५१ लाख ७६ हजार ९१३ रुपयांचा थकीत कर वसूल करण्यात आला आहे. आता मार्च अखेरपर्यंत सुमारे ५० कोटी रुपयांच्या करवसुलीचे उद्दिष्ट मालमत्ता कर विभागाला देण्यात आले असून या वसुलीसाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची जोरदार धडपड सुरू झाली आहे.

### खुल्या जागा मिळकतींची मागविणार माहिती

शहरातील सुमारे अडीच लाख मिळकतदारांपैकी तब्बल ७० हजारावर मिळकती या खुल्या जागा आहेत. खुल्या जागांची कर वसुली ही १९ टक्के देखील नाही. त्यांच्याकडून कराची थकबाकी वसूल करण्यासाठी आता विविध नियोजन आखल्या आहेत. खुल्या मिळकतदारांची संपूर्ण माहिती गोळा करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि उपनिबंधक खरेदी विक्री कार्यालयाकडून माहिती घेण्यात येणार आहे.

### १५ दिवसात पैसे न भरल्यास लिलावाची प्रक्रिया

सील करण्यात आलेल्या मिळकतदारांना १५ दिवसाची मुदत देण्यात आली आहे. यानंतर अशा सर्व मिळकती जप्त करून कायदेशीररित्या लिलाव करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. आता यापुढे ही मोहीम तीव्र करण्यात येणार असून यासाठी विविध पथके तयार करण्यात आली आहेत.



## सूर्य नमस्कार स्पर्धेत विवेकानंद स्कूलचे वर्चस्व

**सुराज्य/सोलापूर** : येथील विवेकानंद पब्लिक स्कूलने जिल्हास्तरीय आंतरशालेय सांघिक सूर्य नमस्कार स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत योग व सूर्य नमस्कार प्रकारातील आपले वर्चस्व कायम राखले. इनरव्हील क्लब, सोलापूर जिल्हा योग परिषद व योग साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुमवि प्रशालेत आयोजित केलेल्या आंतरशालेय सांघिक सूर्य नमस्कार स्पर्धेत शाळेतील मुलींनी उत्तुंग कामगिरी केली. । सूर्य नमस्कार स्पर्धेत शाळेतील इ. १ली ते ४ थीलतील मुलींनी नावीन्यपूर्णरित्या सूर्यनमस्कार सादर करत स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. यशस्वी मुलींच्या संघामध्ये स्वरा लिगाडे (इ. १ली), राधा गुदले (इ. १ली), भक्ती सावंत (इ. २री), समृद्धी वाघमारे (इ. २री), सिद्धी इंगवले (इ. २री), त्रिशा शिंदे (इ. ३री), विधी धूत (इ. ३री), जान्वी पाटील (इ. ३री), रिया चव्हाण (इ. ४थी), मानवी चुंगे (इ. ४थी), अर्पिता व्यवहारे (इ. ४थी), श्रेया सावळे (इ. ४थी) आदी स्पर्धक सहभागी होते.



## 'राज'च्या मधुरा माळी हिची राज्य तलवारबाजीसाठी निवड

**सुराज्य/सोलापूर** : येथील विवेकानंद पब्लिक , जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमधील उत्कृष्ट खेळाडू इ. ८वीमध्ये शिकत असलेली मधुरा संतोष माळी हिची अहमदनगर या ठिकाणी झालेल्या पुणे विभागीय तलवार बाजी स्पर्धेतून, छ. शिवाजी महाराज क्रीडा संकुल, भंडारा या ठिकाणी होणाऱ्या १४ वर्षाखालील मुलींच्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेकरिता सायबर या प्रकारात निवड झाली आहे. तिला क्रीडाशिक्षक अतुल सोनके, सागर जगझाप, मुख्य तलवारबाजीचे प्रशिक्षक पवन भोसले यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे. यशस्वी खेळाडू मधुरा माळीचे संस्था अध्यक्ष महेश अण्णा कोठे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.



## लोकमंगल फाउंडेशनतर्फे शिवजयंतीनिमित्त गणवेश वाटप

**सुराज्य/सोलापूर** : लोकमंगल फाउंडेशनतर्फे शिवजयंतीनिमित्त महापालिकेच्या शाळात गणवेश वाटप आणि खाऊ वाटप कार्यक्रम राबवण्यात आला. उत्कर्ष नगर येथील महानगर पालिका शाळा क्रमांक ४ येथील शाळेत विद्यार्थांना गणवेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, मनपाचे प्रशासनाधिकारी हणमंत जाधवर, राजेंद्र लिंबेतोटे, महेश देवकर, मुख्याध्यापक जाधवर आदी उपस्थित होते. सुंदरम् नगर येथील महानगरपालिका शाळा क्रमांक २८ येथील विद्यार्थ्यांसोबत शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी १४० विद्यार्थांना शालेय गणवेश व खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, राजेंद्र लिंबितोटे, महेश देवकर, अतुल गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक सुतार तसेच शिक्षक व पालक उपस्थीत होते.

## छ. शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**सुराज्य/सोलापूर** : लोकमंगल फाउंडेशनतर्फे शिवजयंतीनिमित्त महापालिकेच्या बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन सर्व देशवासियांना राष्ट्रीय लोक जनशक्ती पार्टी एससी एसटी सेल सोलापूर शहर जिल्ह्याच्यावतीने शुभेच्छा देण्यात आले. यावेळी प्रदेश अध्यक्ष नितीन कांबळे, शहर जिल्हा अध्यक्ष सचिन कांबळे, जगदीश ओहोळ, नरसिंग क्षीरसागर, नितीन क्षीरसागर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सुळेवाडीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**माळशिरस** : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील संतोष मित्रमंडळ व कैलास दडस प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. स्व. कैलास दडस यांचे मित्र अशोक सुळे यांनी आपल्या मित्राच्या स्मृतिदिनानिमित्त सलग १३ वर्षे सुळेवाडीत विविध उपक्रम राबवतात.

या कार्यक्रमास सुळेवाडीचे सरपंच बापूराव करडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाजीराव सुळे, एलआयसी आफिसर हनुमंत सुळे, प्रा. प्रमोद बिडे, माजी सरपंच नाथा सोलंकर, विक्रम सुळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष विठ्ठल सोलंकर, शंकर मेटकरी, नवलकुमार गाडे, शिवराज पुकळे, अनिल सोलंकर, सदा खताळ, अण्णा सुळे, बापू सुळे, कृष्णा सुळे, लक्ष्मण माने, समाधान सुळे, संजय पाटील, प्रमोद भैस, विशवजित गोरड, अभिजीत तावरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक धोत्रे यांनी केले.

## कोन्हेरी परिसरात बिबट्यासदृष्य प्राणी आढळला

सुराज्य/मोहोळ

मोहोळ तालुक्यात कोन्हेरी परिसरातील एका बागेत बिबट्या सदृष्य प्राणी दिसून आला, तर माने वस्ती येथील विठ्ठल लवटे बोकडांवर हल्ला केल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

गेल्या चार वर्षापासून प्रत्येक वर्षी याच दिवसांमध्ये करमाळा, माढा सह मोहोळ तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ चालु असतो. याच पार्श्वभूमीवर यावर्षीही मोहोळ तालुक्यात फेब्रुवारीमध्येच बिबट्याचा वावर आढळून आला आहे. गुरुवारी दि. २३ रोजी वाफळे परिसरात दिसल्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी कोन्हेरी येथील जरग वस्ती परिसरात नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाल्याने घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे तर माने वस्ती येथील विठ्ठल लवटे यांच्या बोकडांवर हल्ला केल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



कोन्हेरी परिसरात बिबट्या आढळल्याची माहीती मिळताच तालुक्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश उटगी यांनी परिसरात गस्त लावण्यात आल्याचे सांगितले. याशिवाय नाईट पेट्रोलिंग सुरू केली असून शेतकऱ्यांना काही आढळून आल्यास तातडीने वनखात्याशी संपर्क साधावा व शेतकऱ्यानी सावधगिरी बाळगावी, शेतात कामे करताना सावधानता बाळगावी, लहान मुले व महिलांना एकटे सोडू नये, बिबट्या एकाच भागात जास्त दिवस राहत नसल्याने नागरिकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन मोहोळ तालुक्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश उटगी यांनी केले आहे.

## आचार्य नारायण गुरुजींचे आज मार्गदर्शन

**सुराज्य/मंगळवेढा** : 'ध्यान प्राणायम व आहार' या त्रिसुत्रीच्या माध्यमातून आपले आरोग्य चांगले ठेवणेसाठी आचार्य नारायण गुरुजींचे मार्गदर्शन व्याख्यान रविवार दि,२६ रोजी सांय ६.३० वा. ठेवण्यात आल्याची माहिती कृषिभूषण अंकुश पडवळे व संतोष दुधाळ यांनी दिली.

भारतीय संस्कृती विद्या केंद्र, कोल्हापूर व धनश्री परिवार, मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, किल्ला भाग, मंगळवेढा येथे मोफत मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

## मंगळवेढ्याच्या पडवळेंना राष्ट्रीय कृषी पुरस्कार

### सोलापूरच्या शेतकरी पुत्राचा देशात डंका

सुराज्य/सोलापूर

भारत सरकारच्या केंद्रीय कृषी व किसान कल्याण मंत्रालयाच्यावतीने भारतीय कृषी अनुसंधान परिषद व भारतीय कृषी संशोधन संस्था यांच्यातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय नाविण्यपूर्ण शेतकरी पुरस्कार-२०२३ हा पुरस्कार महाऑरगॅनिक अ‍ॅन्ड रेश्युड्युफ्री फार्मर्स असोशिएशनचे अध्यक्ष कृषिभूषण अंकुश पडवळे (मंगळवेढा, जि. सोलापूर) यांना जाहीर करण्यात आला आहे.



भारत सरकारच्या कृषी व किसान कल्याण मंत्रालयाच्यावतीने दरवर्षी असे पुरस्कार देशभरातील नाविण्यपूर्ण व शेतकऱ्यांना दिशादर्शक काम करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येतो. यापूर्वी ही पडवळे यांना केंद्रसरकार, राज्यसरकार व विविध स्वयंसेवी संस्था क अंकुश पडवळे हे गटशेती, सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सतत मार्गदर्शन व सहकार्य करीत असतात. तसेच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न ते केंद्र व राज्य सरकार यांच्या कडे अभ्यासपूर्ण पणे मांडतात. त्यांच्या या कामाचीच दखल घेऊन केंद्र सरकारने त्यांना हा राष्ट्रीय कृषी पुरस्कार जाहीर केला आहे.

सदर पुरस्कार पुसा संस्थेच्या मेळावा ग्राऊंडवर दि. २ ते ४ मार्च दरम्यान होणाऱ्या पुसा कृषी विज्ञान मेळाव्यात ४ मार्चला केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर व केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाश चौधरी यांच्या हस्ते विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

### ४ मार्चला होणार वितरण

पुरस्कार पुसा संस्थेच्या दि. २ ते ४ मार्च दरम्यान होणाऱ्या पुसा कृषी विज्ञान मेळाव्यात ४ मार्च ला केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर व केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाश चौधरी यांच्या हस्ते विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

## फरजाना सय्यद यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

सुराज्य/सोलापूर

गेल्या २९ वर्षांपासून ज्ञानदानाचे पवित्र कार्य मंद्रुप जि. प. उर्दू प्राथ. शाळेचे शिक्षिका फरजाना अकील अहंमद सय्यद यांना राज्य ऊर्दू शिक्षक संघटनेच्यावतीने या वर्षाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाला आहे. (मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख यांच्या हस्ते व संघटनेचे राज्य अध्यक्ष एम. ए. गफार, अब्दुल कादर करजगी यांच्या उपस्थितीत त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



### हर्षवर्धन प्रशालेत निरोप समारंभ

हिप्परगे तळे येथील हर्षवर्धन हायस्कूल इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ घेण्यात आला. यावेळी प्रशालेतील सहशिक्षक सुरेश शिंदे व ज्ञानेश्वर गुंड यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक लक्ष्मण राऊत यांनी एक आदर्श नागरिक बना असा आशावाद व्यक्त केला. यावेळी उपाध्यक्ष विद्याधर जगताप, सचिव विठ्ठलराव गरड, अध्यक्ष हर्षवर्धन लोंढे उपस्थित होते.

## मारहाण प्रकरणातील २३ आरोपींची निर्दोष मुक्तता

सुराज्य/सांगोला

पंढरपूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. के. मोरे यांनी कडलास (ता. सांगोला) येथील २३ आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

कडलास येथील शेतजमीन गट नं. १६० चे कब्जे वहिवाट व कुळाचे कारणावरून बाळासाहेब ननवरे (कोळी) व त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती तसेच ज्योतीराम पवार वगैरे २२ यांच्यात जबरी भांडण व जाळपोळ झाली होती. बाळासाहेब ननवरे (कोळी) यांनी ज्योतिराम पवार, चंद्रकिशोर पवार, सुनील पवार, संगमनाथ पवार, राहुल गायकवाड, संजय लेंडवे, दिपक काशीद, जगन्नाथ कोडग, धनंजय गायकवाड, मारूती पवार, राहुल गायकवाड, रामचंद्र पवार, लक्ष्मण पवार, गोपीनाथ पवार, बाळासाहेब गुरव, भारत गायकवाड, अशोक गायकवाड, अरविंद गायकवाड, प्रवीण गायकवाड, सैफअली पटेल, उध्दव गायकवाड, अंकुश माने, भारत बुरंगे यांच्याविरूध्द फिर्याद दाखल केलेली होती. चौकशीचे कामकाज पंढरपूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. के. मोरे यांचे कोर्टामध्ये चालले. वकिलांच्या युक्तीवादानंतर वकिलांनी सर्व २३ आरोपींविरूध्द सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. यामध्ये आरोपीतर्फे अ‍ॅड. गिरीष तपकिरे (सांगली) व अ‍ॅड. सतीश लेंडवे (सांगोला) यांनी पाहिले.

## 'भैरवनाथ'तर्फे माळी कुटुंबियाला आर्थिक मदत

सुराज्य/मंगळवेढा



नंदेश्वर (ता. मंगळवेढा) येथे घडलेल्या तिहेरी हत्याकांडातील बाळू महादेव माळी कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांना एक लाख रुपयाची आर्थिक मदत भैरवनाथ शुगरचे व्हा. चेअरमन अनिल सावंत यांनी केली.

बाळू महादेव माळी कुटुंबाचे जे नुकसान झाले आहे ते कधींच न भरून निघणारे आहे, ही घटना खरोखरच मानवतेच्या धर्माला आणि सामाजिक एकरूपतेला काळिमा फासणारी आहे, असे यावेळी भैरवनाथ शुगरचे व्हा. चेअरमन अनिल सावंत म्हणाले.

भैरवनाथ शुगरचे संस्थापक आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत व भैरवनाथ शुगरचे चेअरमन प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली भैरवनाथ शुगर हा नेहमींच सामाजिक बांधिलकी जोपासत आला आहे. त्याच बांधीलकीतून आज 'फूल ना फुलाची पाकळी' या भावनेतून भैरवनाथ शुगरचे व्हा. चेअरमन अनिल सावंत यांनी यावेळी बाळू महादेव माळी यांचा कुटुंबाला एक लाखाची आर्थिक मदत जागेवरच देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. यावेळी शिवसेना तालुका अध्यक्ष अशोक चौडे, बंडू जाधव, अण्णा लवटे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.


# शेतजमिनीसाठी पोटहिश्यानुसार स्वतंत्र सातबारा कधी होणार?

### मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना लागली आदेशाची उत्सुकता

सुराज्य/चिखली

**ग्रामीण भागात सर्वत्र शेतजमिनीवरून भावभावकीत नेहमीच तंटे आणि भांडण पाहायला मिळतात. अनेकांच्या जमिनी याच कारणामुळे पडीक राहिल्या आहेत. अनेक एकत्रित कुटुंबात याच कारणामुळे घरातील भांडणं सतत विकोपाला गेल्याच देखील अगदी सहज चित्र पाहायला मिळतं. मात्र यावर एक आनंदाची बातमी देखील सरकारी आणि प्रशासन पातळीवरून गेल्यावर्षीच ठाकरे सरकारने संबधित विभागाला आदेश दिल्यानंतर समोर आली होती. परंतु अद्यापही आदेशाची अमंलबजावणी कोठे झाली नसल्याने मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना याची उत्सुकता लागली आहे.**

शेतजमिनीच्या वादातून होणाऱ्या भांडणाचे कारण ठरणाऱ्या पोटहिस्स्याचेही आता स्वतंत्र सातबारा तयार केले जाणार होते. भूमीअभिलेख विभागाने यासाठी विशेष मोहीम हाती घेतली समोर आले होते. या मोहिमेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा सातबारा अभिलेख हिस्स्याप्रमाणे वेगळे केले जाणार होते. विशेष म्हणजे-त्यांचे स्वतंत्र नकाशे तयार केले जाणार असल्याने या पद्धतीचा शेतकऱ्यांना फायदा देखील होणार आहे. वडिलोपार्जित जमिनीच्या सातबारा अभिलेखावर बहीण भावांची तसेच सहहिस्सेदारांची नावे असतात. अशा सातबारावरील नावानुसार प्रत्येकाचा हिस्सा निश्चित असतो. त्यानुसार वाटणी होऊन जमीन ताब्यात जाते. वाटणी झालेल्या



जमिनीनुसार वहिवाटही असते. परंतु, अनेकदा सातबारा एकच असल्यामुळे पोटहिस्स्यावरून भांडणे होतात. असे वाद कोर्टात देखील जातात. तथापि, पोटहिस्स्याचा स्वतंत्र सातबारा अभिलेख तयार करण्यासाठी भूमी अभिलेख उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून समितीने केलेल्या शिफारसीनुसार भूमी अभिलेख विभागाच्या संचालकांनी अभिलेख पोटहिस्सा मोहीम राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये सरपंच, तलाठी व ग्रामसेवकांच्या सहकार्याने गावागावात सभा घेऊन या मोहिमेची माहिती देण्यात येणार होती. संमतीने पोटहिस्स्याचा सातबारा स्वतंत्र करायचा असेल तर त्यासाठी तारीख निश्चित होईल आणि भूमिअभिलेख विभागाचे अधिकारी, कर्मचारी गावात येऊन अर्ज स्वीकारतील आणि आठवडाभरात त्या अर्जांवर कार्यवाही सुरू होतील.

सर्व हिस्सेदारांच्या स्वाक्षऱ्या घेतल्यावर प्रत्येकाचे स्वतंत्र नकाशे तयार करून तहसीलदारांकडे वर्ग करण्यात आल्यानंतर तहसीलदार हे सातबारा स्वतंत्र करतील. त्यासाठी नाममात्र १,००० रुपये एवढे शुल्क आकारण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांना फायदा होऊन तंटे थांबणार

यामध्ये मोजणीची आवश्यकता नसल्यास विना मोजणी सातबारा आणि स्वतंत्र नकाशे करून घेता येणार होते. या मोहिमेचा लाखो शेतकऱ्यांना फायदा होऊन , भांडणेदेखील थांबणार आहेत. परंतु याची अद्यापही कोठे अमंलबजावणी झाली नसल्याने सात बारा विभक्तचा आदेश पारित केव्हा होणार याची उत्सुकता लागली आहे.

## ‘महामंडळाच्या योजनेचा अल्पसंख्याक समाजाने लाभ घ्यावा’

सुराज्य/मंगळवेढा : अल्पसंख्याक समाजातील तरुणांनी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या शैक्षणिक व उद्योग कर्ज योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. समाधान आवताडे यांनी केले.

भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या पुण्यतिथीनिमित्त महामंडळाच्या व्यावसायिक कर्ज योजनेसंदर्भात मार्गदर्शन शिबिर शशिकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य हिंदुस्तानी व शशिकला मुदगुल यांनी शनिवार पेठ येथे आयोजित करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हा संघटक सरचिटणीस शशिकांत नाना चव्हाण, लेबर फेडरेशनचे संचालक सरोज काझी, आझाद दारुवाले, जिल्हा युवा मोर्चाचे सुदर्शन यादव, सुशांत हजारे, बाबा कौंडुभैरी, शिवाजी जाधव, सुरेश मेटकरी, झाकिर तांबोळी, शबिर रोंगिकर, झाकिर रोंगिकर, रियाज शेख, सोहेल रोंगिकर, शफिक बोकारि, शाबान शेख, आरिफ तांबोळी, जावेद सुतार, तनविर मनेरी, राहिल जमादार, सुलेमान रोंगिकर, सरफराज गोरी, अलताफ शेख, अफताब बोकारि, शरिफ शेख, जाविर तांबोळी, रेहान जमादार, गब्बर बोकारी, तब्ब गोरी, जुबेर रोंगिकर, अक्षय मुदगुल, सतीश मुदगुल उपस्थित होते.

## निमगाव येथे आज कुस्त्यांचे मैदान

सुराज्य/निमगाव : बहुजन प्रतिपालक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव म. (खंडोबा मंदिराच्या पाठीमागे) ता. माळशिरस येथे रविवार २६ फेब्रुवारी २०२३ रोजी सालाबादप्रमाणे निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित केले असल्याची माहिती राजे प्रतिष्ठान व पवार तालीमचे वस्ताद गोरख पवार यांनी दिली.

या कुस्ती मैदानात रक्कम रुपये १०० पासून ते ५ हजार रुपये किमतीच्या निकाली कुस्त्या लावल्या जातील या कुस्त्या आज रविवार दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत नेमल्या जातील व नेमलेल्या कुस्त्याच मैदानात लावल्या जातील. मैदानात कोणतीही कुस्ती पैलवानास फिरवून लावली जाणार नाही, उशिरा येणाऱ्या पैलवानाचा विचार केला जाणार नाही. या कुस्ती मैदानात सुप्रसिद्ध कुस्ती निवेदक पैलवान युवराज केचे यांना कुस्ती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल राजे प्रतिष्ठानच्यावतीने छत्रपती पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी या कुस्ती मैदानास तमाम कुस्ती शौकिनांनी उपस्थित रहावे, असे आवाहन वस्ताद गोरख पवार यांनी केले आहे.

## बेकायदेशीररित्या गॅसचा वापर; लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर : बेकायदेशीररित्या घरासमोर घरगुती वापरायच्या गॅस टाकी मधील गॅस इंधन म्हणून इलेक्ट्रिक मोटारीच्या साह्याने रिक्षामध्ये भरत असताना व लोकांच्या जीवितास धोका निर्माण करून हयगयीचे कृत्य करताना एक जण मिळून आला आहे. ही घटना दि. २४ फेब्रुवारी रोजी दु. १२च्या सुमारास मंजुनाथ नगर येथे घडली. हरिदास शंकर गायकवाड (वय-५०, रा. मंजुनाथ नगर, लिमयेवाडी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे.

गायकवाड याच्याकडून एक लाख रुपये किमतीची ऑटो रिक्षा क्र.एम.एच.१३.सीटी.२५१७, पाच हजार रुपये किमतीच्या दोन गॅस टाक्या, तीन हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक मोटर, दोन हजार रुपये किमतीचा वजन काटा असा एकूण एक लाख दहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशा आशयाची फिर्याद सहाय्यक फौजदार केरू आण्णा पवार यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वाबळे हे करीत आहेत.

## तडीपार आदेशाचे उल्लंघन

सुराज्य/सोलापूर : दोन वर्षाकरिता सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून तडीपार केलेल्या इसमाने आदेशाचे उल्लंघन केल्याची घटना दि.२१ फेब्रुवारी रोजी रात्री उघडकीस आली आहे. सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन करीत असताना तडीपार इसम सागर मारुती वालकुंडे (रा. काळजापूर मारुती मंदिराच्या जवळ, रेल्वे लाईन, सोलापूर) याला पोलीस उपायुक्त परिमंडळ यांनी सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले असताना वरिष्ठांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता लोकसेवकाच्या तडीपार आदेशाचे उल्लंघन करून भारतरत्न इंदिरा नगर, सत्तर फूट रोड, सोलापूर येथील त्याच्या स्वतःच्या राहत्या घरी मिळून आला आहे, अशा आशयाची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल चिदानंद काळजे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.

## रस्ता ओलांडताना दुचाकीची तरुणीला धडक

सुराज्य/सोलापूर : अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगात व निष्काळजीपणाने वाहन चालून एक तरूणी रस्ता ओलांडत असताना तिला धडक देऊन तिच्या डोक्यास, पायास, छातीस, गंभीर दुखापत होण्यास दुचाकी चालक कारणीभूत ठरला असल्याची फिर्याद मुलीची आई मनीषा सुखदेव रजपूत (वय-४५, रा. मु. पो. शिवाजीनगर तांडा, ता. उत्तर सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.

# सांगोल्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा कार्यक्रम सुरु

### प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध
### २ मार्चपर्यंत हरकती घेता येणार

सुराज्य/सांगोला

**सांगोला तालुक्यातील हलदहिवडी, वझरे, सोनंद, गळवेवाडी, जवळा आणि डोंगरगाव अशा ६ ग्रामपंचायतीच्या ६ रिक्त जागेसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. दरम्यान शुक्रवारी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार अभिजीत पाटील यांनी दिली आहे.**

तालुक्यातील हलदहिवडी येथील प्रभाग क्रमांक एकमधील नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री राखीव या प्रवर्गातील गोदाबाई बड्डू कुंभार, वझरे प्रभाग क्रमांक दोनमधील नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गातील कल्पना लक्ष्मण चव्हाण, सोनंद प्रभाग क्रमांक चारमधील सर्वसाधारण प्रवर्गातील राहुल विलास काशीद, गळवेवाडी प्रभाग क्रमांक तीनमधील नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री प्रवर्गातील स्वाती कुंडलिक



गळवे, जवळा प्रभाग क्रमांक तीनमधील सर्वसाधारण स्त्री राखीवमधील रुक्मिणी अरुण साळुंखे आणि डोंगरगाव प्रभाग क्रमांक दोनमधील नागरिकांचा मागासप्रवर्ग प्रवर्गातील गणेश तातोबा राजगे यांचे निधन झाल्याने एकूण ६ ग्रामपंचायतमधील ६ सदस्यांच्या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक

### ९ मार्चला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होणार

शुक्रवार दि. २४ रोजी रिक्त जागेच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यावर हरकती घेण्यात येणार आहे. हरकतीसाठी शुक्रवार २४ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत कालावधी असणार आहे. तर ९ मार्च २०२३ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तहसीलदार अभिजीत पाटील यांनी कळविले आहे.

कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

निधन झालेल्या तसेच राजीनामा अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या तसेच सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदीनुसार पोटनिवडणुका विहित मुदत घेण्यासाठी ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत विविध कारणामुळे रिक्त झालेल्या जागांची माहिती आयोगाच्या ५ जानेवारी २०२३ च्या पत्राने मागविण्यात आली होती. त्यानुसार सांगोला तालुक्यातील ६ ग्रामपंचायतीच्या ६ जागेसाठी सदरची निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

## पन्नास हजाराचा मोबाईल चोरला

सुराज्य/सोलापूर



अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधत बेडरूममध्ये ठेवलेला ५० हजार रुपये किमतीचा महागडा मोबाईल चोरून नेल्याची घटना दि. २१ फेब्रुवारी रोजी शुक्रवार पेठ माणिक चौक येथे घडली. याप्रकरणी राज शंकर झवेरी (वय-३३, रा. शुक्रवार पेठ, माणिक चौक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार अवचारे हे करीत आहेत.

# आरोपीला कडक शिक्षेसाठी गृहमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार: आ. आवताडे

सुराज्य/पंढरपूर

**नंदेश्वर येथील तिहेरी हत्याकांडाची घटना ही खरोखरच मानवतेच्या धर्माला आणि सामाजिक एकरूपतेला काळीमा फासणारी असून या घटनेतील आरोपीला कडक व जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे पाठपुरावा करणार असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले. तिहेरी हत्याकांडाला बळी ठरलेल्या माळी परिवाराचे सांत्वनपर भेटीप्रसंगी ते बोलत होते.**

आमदार समाधान आवताडे यांनी समस्त माळी कुटुंबियास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना केली. सुसंस्कृत भारतीय मानवतेच्या



आचरणामध्ये अशा प्रकारच्या अमानुष आणि निंदनीय घटनेचा आ. आवताडे यांनी तीव्र शब्दात निषेध केला.

संपूर्ण घटनेचा सखोलपणे छडा लागून पीडित माळी कुटुंबास योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून आरोपींना कठोर शिक्षा होण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आ. आवताडे यांनी सांगितले. यावेळी प्रा. येताळा भगत, जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर, लक्ष्मण नरुटे, दत्ताभाऊ साबणे, पै. अशोक चांडे, धनाजी गडदे, आकाश डांगे, दादा दोलतोडे, आप्पा रामगडे, भारत गरंडे, दामाजी बंडगर उपस्थित होते.

## राष्ट्रीय योगमोडो स्पर्धेत व पंचपरीक्षेत सोलापूरचे यश

सुराज्य/सोलापूर : सातव्या राष्ट्रीय योगमोडो (मार्शल आर्ट) स्पर्धेत व पंच परीक्षेचे आयोजन नांदेड, महाराष्ट्र येथे आयोजन केले होते. या स्पर्धेमधील योगमोडो असो. सोलापूरच्या मुले व मुली भाग घेतला होता.

या स्पर्धेत लक्ष्मी प्रकाश हवळगी हिला रौप्यपदक मिळाले व तसेच महम्मद अयान आरिफ तांबोळी याला कांस्यपदक मिळाले, यांची अशी या स्पर्धेसाठी निवड झाली असून व तसेच या स्पर्धेसाठी राष्ट्रीय पंचपरीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे नाव सचिन कुंभार, आशिष जाधव, अनुज भालेराव, आशिष जाधव, रोनक गोडोल्लू, अथर्व गोडोलल्लू या सर्वांनी ब्लॉकबेल्ट परीक्षेत यश संपादन केले व तसेच मोनिका स्पोर्टक्लबचे अध्यक्ष मोनिका कसबे (नागमोडे) व सचिन नागमोडे व रेखा कसबे यांचे मार्गदर्शन लाभले व सोलापूर जिल्ह्यातील कौतुकाचे थाप मिळत आहेत.

## विशाल सुरवसे ‘‘पेठ वडगांव श्री २०२३’’ चा विजेता

सुराज्य/पंढरपूर

पेठ वडगाव येथे कोल्हापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग असो. व महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असो. च्या मान्यतेने आयोजित केलेल्या पश्चिम महाराष्ट्र मर्यादित या स्पर्धेत पंढरपूरचा विशाल सुरवसे हा विजेता ठरला.

कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा व सिंधुदुर्ग येथील १५० स्पर्धकांनी नोंदविला. या स्पर्धा ५ वजनी गटात घेण्यात आल्या. प्रत्येक गटात ५ बक्षिसे ठेवण्यात आली होती. ५ वजनी गटातील प्रथम क्रमांकाचे विजेत्यामध्ये पुन्हा



स्पर्धा झाली व त्यामध्ये विशाल सुरवसे हा सरस ठरला व त्याला पेठ वडगाव श्री २०२३ म्हणून सन्मानित करण्यात आला.


कोल्हापूरचा अक्षय दांडेकर मोस्ट ईम्प्रुव्हड व सांगलीचा मनोहर लाड बेस्ट पोझर म्हणून घोषित करण्यात आले.

सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, मनोज भागवत, अजित कडरे, प्रमोद काटे, नझीर शेख, गोरख गडसिंग, अल्ताफ सिद्दीकी, शफी शेतसंदी, शकील बडेकर व संलग्न सर्व तालुक्यातील संघटनेने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## ‘दामाजी’ची गाळप क्षमता पुढील हंगामात दुप्पट करणार : शिवानंद पाटील

सुराज्य/मंगळवेढा

**पहिल्या गळीत हंगामात संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे श्री संत दामाजी साखर कारखान्यास गाळपासाठी दिलेल्या ऊस उत्पादकाची हंगाम अखेर बिले येत्या पंधरा दिवसांत देणार असून पुढील गळीत हंगामापासून गाळप क्षमता देखील दुप्पट करणार असल्याची ग्वाही अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी दिली.**



श्री संत दामाजी साखर कारखान्याचा यंदाच्या गळीत हंगामाचा कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी धनश्री परिवाराचे संस्थापक शिवाजीराव काळुंगे होते. यावेळी अध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, रतनचंद शहा बँकेचे अध्यक्ष राहूल शहा, रामकृष्ण नागणे, उपाध्यक्ष तानाजी खरात उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष पाटील म्हणाले, ‘ही संस्था सभासदांच्या मालकीची राहिली पाहिजे. यासाठी उपाध्यक्ष तानाजी खरात व संचालक मंडळ कटिबध्द् आहे. यंदा हंगामात ११५ दिवसात ३ लाख ८२ हजार टन ऊस गाळप केले. यंदा ऊसाचे टनेज कमी निघाल्याने गाळप कमी झाले. गळीत हंगामात शेतक-यांची ऊस बिले, कामगार पगार, तोडणी वाहतुक ठेकेदारांची बिले वेळेवर दिली आहेत.

## पंढरपूर येथे हस्त समुद्री व वास्तुविज्ञान अधिवेशन

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर येथे नुकतेच हस्त समुद्री व वास्तुविज्ञान अधिवेशन पार पडले. अखिल भारतीय स्तरावरचे हे संमेलन ज्योतिषाचार्य रेखा किशोरी टाक यांनी आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी उद्योजक शैलेंद्र बजाज उपस्थित होते.

या ब्रह्मा दत्त शर्मा लुधियाना यांना श्री राजराजेश्वरी पितामह सन्मान, तसेच रोहित जी वर्मा उज्जैन यांना श्री राजराजेश्वरी कर्मयोगी सन्मान, उपेंद्र भधोरियाजी अहमदाबाद यांना राजराजेश्वरी विद्यावाचस्पती सन्मान, भारती जी चौधरी यांना राज राजेश्वरी



तेजस्विनी, दामोदर बंसलजी जयपूर यांना राजेश्वरी पारस शिरोमणी सन्मान, मोहन दाते यांना राजराजेश्वरी भास्कर सन्मान, गुरु श्री प्रिया मालवणकर मुंबई यांना राजराजेश्वरी ब्रह्मा गुप्ता सन्मान व शैलेश बजाज यांना कार्य गौरव सन्मान मिनू श्री शर्मा फरीदाबाद यांना गणेश उपाधी, गौरी केंजाळे पुणे यांना विनम्र क्वीन उपाधी, ज्योतिषशास्त्र शास्त्रातील अभ्यासक बळीराजाची भारतभोई दवे सचिन बेहेरे मिनू कार्तिकी काका दुर्गेश गुप्ता, रमेश गुरु, वैशाली अत्रे यांचा ज्योतिष्यशास्त्रामधील विशेष योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.

## कारची दुचाकीला धडक; दोघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

**रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवलेल्या दुचाकीला भरधाव वेगात येणाऱ्या कारने धडक देऊन दुचाकीचे ३० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




ही घटना दि.१५ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास साई हॉटेल समोरील वसंत विहार येथे घडली. याप्रकरणी विजयालक्ष्मी योगिनाथ शेट्टी (वय-३६, रा. जुना पुना नाका) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. एक अनोळखी महिला कार चालक (क्रमांक. एम. एच.१३. डीवाय. ५७५०) व गणेश देशमुख या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

# किराणा दुकानाला आग; लाखोंच्या मालाचे नुकसान

सुराज्य/मोहोळ

टाकळी सिंकदर येथील शिवाजी चौकातील दिलीप वाघमोडे यांच्या वाघमोडे किराणा स्टोअर्सला शनिवार सकाळी आठ ते साडेआठ वाजण्याच्या दरम्यान आग लागून लाखो रुपयाचे नुकसान झाल्याची माहिती पुढे येत आहे. या आगीत कोणती ही जिवित हानी नाही.

शनिवारी नेहमी प्रमाणेच दुकान उघडण्यासाठी दिलीप वाघमोडे व त्यांचा मुलगा चंद्रकांत वाघमोडे (रा.पुळूज ता.पंढरपूर)आले.या दोन मजली दुकानाचे शटर उघडून स्वच्छता करित असताना माल साठवणूक केलेल्या ठिकाणी ताड- ताड आवाज करत आग लागल्याचे लक्षात आले.परंतु सर्व दुकानात मोठ्याप्रमाणात माल असल्याने नेमकी आग कुठे लागली याचा अंदाज त्यांना लागू शकला नाही असे तेथे उपस्थित असलेल्या लोकांकडून सांगण्यात आले. किराणा मालाच्या स्टोअरला लागलेली आग बघता बघता सर्वत्र पसरली.संपूर्ण स्टोअरमध्ये धूराचे लोट येऊ लागल्याने परिसरात उपस्थित असलेल्या लोकांनी दुकानातील साहित्य बाहेर काढण्यास मोठी मदत केली. तोपर्यंत भिमा सह.साखर कारखान्याच्या अग्निशामक वाहनाने पाणी मारून सुध्दा आग नियंत्रणात आली नाही.

सुराज्य Classified

विवाह विषयक

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : 9763624364, 7410553871 (040323)

# ‘ताहेरा’तर्फे ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा

## ज्येष्ठांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे : जयसिंह मोहिते-पाटील

सुराज्य/अकलूज

**ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी. चिंतामुक्त जीवन जगावे. छंद जोपासावेत आणि वृद्धापकाळात आरोग्याची काळजी घ्यावी, असे मत सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.**

ताहेरा फाउंडेशन अकलूज आयोजित ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा या कार्यक्रमातून अध्यक्षपदावरून ते बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के. इनामदार, चार्टर अकाउंटट आर. सी. फडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ताहेरा फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी अबूबकरभाई तांबोळी यांनी फाउंडेशनच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

जुन्या पिढीतील ज्या नागरिकांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या मुलांना समाज आणि कुटुंब उपयोगी बनवलं त्या सर्व ज्येष्ठांचा सन्मान ताहेरा फाउंडेशनच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. इनामदार यांनी मनोगतात स्वतःपासून समाज निर्माण होतो आणि समाजातून देश निर्माण होतो. तसेच एकोप्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

ज्येष्ठांनी आपल्या नातवंडांच्या बरोबर वेळ घालवावा. आजोबा आणि नातू यांचे नातं हे वेगळंच असल्याचं त्यांनी सांगताना एक सुंदर गोष्ट उपस्थितांना सांगून




सर्वांचे मन प्रफुल्लित केले.

यावेळी प्रा. अबूबकर महंमद शेख तांबवे, हाजी रसूल नदाफ यशवंतनगर, हाजी अली भाई पाटावाला अकलूज, अब्दुल लतीफ करीम शेख माळशिरस, शंकरराव नारायण देशपांडे अकलूज, सुभद्रा वसंत लोंढे अकलूज, मलिकसाहेब बाबनभाई पठाण वरकुटे तालुका इंदापूर, हाजी चांद काझी, अकलूज, शकूर खान आमिरखान पठाण चांदापुरी, दस्तगीर काशीम शेख अकलूज, शेरखान दाऊद खान पठाण अकलूज, मेहबूब चांद मुलाणी अकलूज, रहीम अली शेख गणेशगाव, विश्वनाथ पांडुरंग शेटे गुरुजी अकलूज, अर्जुन शंकर बनसोडे माळीनगर, जैनुद्दीन वजीर शेख अकलूज, युसूफ साहेबलाल शेख अकलूज, हाजी खलील मेहताब देशमुख, संग्रामनगर खलील अब्बास मुलाणी माळशिरस, हाजी सुलेमानशहा मकानदार अकलूज, हाजी अहमदभाई बागवान, जिलानी शेख अकलूज, ॲड. शब्बीर जमादार अकलूज, रफीक पठाण अकलूज यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी डॉ. अब्दुल कलाम आझाद चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष हाजी युसूफ तांबोळी, हाजी बशीरभाई तांबोळी, ड. वजीर शेख, मुख्तार कोरबू, भैया माढेकर, हमीद मुलाणी, अब्बास तांबोळी, दादा तांबोळी, सलीम शेख तनवीर तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन शकील मुलाणी यांनी तर आभार ईलाही बागवान यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हाजी असलम तांबोळी, शाकिर तांबोळी, शहीद तांबोळी, शादाब तांबोळी, जाकिर तांबोळी, शौकत तांबोळी यांनी परिश्रम घेतले.

# मोदी सरकारचा कारभार केवळ आपल्या मित्रांसाठी

✔ सुराज्य/रायपूर

**छत्तीसगडमधील नवीन रायपूर येथे सुरू असलेल्या काँग्रेसच्या ८५व्या पूर्ण अधिवेशनात सोनिया गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. केंद्र सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सर्व स्वायत्त संस्थांवर कब्जा केला आहे. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशासाठी नव्हे तर त्यांच्या मित्रांसाठी राज्यकारभार चालवत आहेत, असा घणाघात सोनिया गांधी यांनी केला.**

भाजपच्या राजवटीला खंबीरपणे सामोरे जाण्याची गरज आहे. आमचा संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्याला जनसंपर्क वाढवावा लागेल, असे सांगून सोनिया गांधी म्हणाल्या, भाजपा विद्वेषाचे राजकारण करीत असून द्वेषाच्या आगीला हवा दिली जात आहे. अल्पसंख्य, महिला, दलित, आदिवासी यांना भाजपाकडून लक्ष्य केले जात आहे.

भाजपाने प्रत्येक यंत्रणेवर कब्जा केल्याने पक्षासाठी आणि देशासाठी ही आव्हानात्मक परिस्थिती असल्याचेही त्यांनी सांगितले. काँग्रेसच्या अधिवेशनाचा शनिवारी हा दुसरा दिवस आहे.

## सोनिया गांधींचे जोरदार टीकास्त्र

काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नसून एक माध्यम आहे, ज्याद्वारे लोक समानता, स्वातंत्र्य आणि न्यायासाठी संघर्ष करतात. काँग्रेसने नेहमीच लोकशाही मजबूत करण्याचे काम केले आहे. आपण लोकांचा आवाज पुढे नेतो आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करतो. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली चांगले सरकार आपण दिले होते. आता आपला मार्ग खडतर असला तरी, आपण नक्कीच जिंकू, असा विश्वास सोनिया गांधी यांनी व्यक्त केला.



## राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेचे कौतुक

सोनिया गांधी यांनी खासदार राहुल गांधी यांचेही भरभरून कौतुक केले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील 'भारत जोडो' यात्राने चांगला परिणाम साधला गेला आहे. या यात्रेत राहुल गांधी यांनी ज्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या ऐकल्या, ते कौतुकास्पद असल्याचे सोनिया गांधी म्हणाल्या.


सन १९९८मध्ये मी पहिल्यांदा पक्षाध्यक्ष झाले तेव्हापासून आजपर्यंत, म्हणजे गेल्या २५ वर्षांत चढ-उतार बघितले. अनेक चांगले तर, काही वाईट अनुभव आले.

२००४ आणि २००९ मधील पक्षाची कामगिरी असो किंवा मनमोहन सिंग यांना पंतप्रधान करण्याचा माझा निर्णय असो, वैयक्तिकरित्या माझ्यासाठी हे समाधानकारक होते. या सर्वांत मला कार्यकर्त्यांचे पूर्ण सहकार्य लाभले. मला सर्वात जास्त समाधान देणारी गोष्ट म्हणजे भारत जोडो यात्रेद्वारे माझ्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीला पूर्णविराम मिळाला. पक्षासाठी हा टर्निंग पॉइंट आहे, असे त्या म्हणाल्या.

# शाहांच्या कार्यक्रमावरून परतणाऱ्या वाहनांचा अपघात, १४ जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/मध्यप्रदेश

**मध्यप्रदेशातील सिधी जिल्ह्यामध्ये शुक्रवारी (ता. २४ फेब्रुवारी) तीन बसेस आणि एक ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये १४ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर जखमी असलेल्या ५० जणांपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. हा अपघात झाल्यानंतर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी जखमींना भरती केलेल्या रुग्णालयाला भेट दिली. तसेच अपघातस्थळी जाऊन पाहणी देखील केली आहे.**



मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या अपघातात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना १० लाख रुपये देण्याची घोषणा केली आहे. तर या अपघातातील गंभीर जखमी झालेल्यांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि किरकोळ जखमी असलेल्या लोकांना एक लाख रुपये देण्याची घोषणा केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहनिया बोगद्याजवळील बरोखर गावाजवळ हा अपघात झाला. रेवा-सिधी बोगद्याजवळ हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले आहे. भरधाव वेगात आलेल्या ट्रकचा टायर फुटल्याने बाजूला उभ्या असलेल्या तीन बसेसवर हा ट्रक जाऊन धडकला. यामध्ये दोन बस उलटल्या, तर तिसऱ्या बसचे मोठे नुकसान झाले. या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षदर्शींच्या मते हा अपघात भीषण असला तरी मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. गंभीर जखमींना रेवा येथील रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

अपघातानंतर या ठिकाणची परिस्थिती गंभीर बनली होती. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी मदत करून जखमींना बाहेर काढले. पोलिसांना माहिती देण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला आहे. अनेक जण जखमी झाले असून त्यापैकी ५२ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे. अपघाताचे गांभीर्य पाहता मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. तसेच काही लोक ट्रकखाली दबले गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# स्वत:वर गोळी झाडत ऑन ड्युटी पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

✔ सुराज्य/मुंबई



एका पोलीस कर्मचाऱ्याने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मुंबईत घडली. मुंबईतील भायखळा कारागृहाबाहेर तैनात असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याने स्वत:वर गोळी झाडली. गुरूवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ताडदेव लोकल आर्म युनिट २ मध्ये कार्यरत असलेले पोलीस हवालदार श्याम वरगडे असे मृताचे नाव आहे. त्यांची नियुक्ती भायखळा तुरुंगाच्या गेटवर करण्यात आली होती. गुरूवारी रात्री ९:२० वाजताच्या सुमारास त्यांनी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. पोलीस हवालदार श्याम वरगडे यांनी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी जखमी वरगडे यांना जे. जे. रूग्णालयात नेले. त्यानंतर रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# मुनगंटीवारांनी रेल्वे अधिकाऱ्यांना खडसावले

✔ सुराज्य/चंद्रपूर

'सर्वांना घरे' ही महत्वाकांक्षी योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी राबवित असताना रेल्वे प्रशासन जलनगर येथे वर्षानुवर्षे वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे अतिक्रमण काढून लोकांना बेघर करीत आहेत. अतिक्रमण काढल्यामुळे संसार उद्ध्वस्त होण्याची वेळ आलेल्या कुटुंबाचा टाहो ऐकून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार तातडीने त्यांच्या मदतीला धावून आलेत. अतिक्रमण काढण्याबाबत रेल्वे प्रशासनाने केलेल्या कारवाईवरून पालकमंत्री मुनगंटीवार यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.



नियोजन सभागृह येथे जलनगर रेल्वे प्रश्नासंदर्भात जिल्हा प्रशासन, रेल्वेचे अधिकारी व नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, महापालिका आयुक्त विपीन पालीवाल, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'सर्वांना घरे' ही पंतप्रधानांची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार काम करीत आहे, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, 'एकीकडे नागरिकांना घरे देण्याची योजना असताना रेल्वे प्रशासन नागरिकांना बेघर करीत आहे. अतिक्रमण काढण्याबाबत रेल्वे बोर्डाचा कोणताही आदेश आला तर सर्वात प्रथम जिल्हा प्रशासन व पालकमंत्री कार्यालयाशी रेल्वे प्रशासनाने संपर्क करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासनाला जमिनीची आवश्यकता असल्यास जिल्हा प्रशासनाचे सहकार्य मागावे. नागरिकांच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी सर्वांना विश्वासात घेण्यात यावे. सरसकट कारवाई करून नागरिकांना बेघर करणे पूर्णपणे चुकीचे आहे.



# सोनिया गांधींचे निवृत्तीचे संकेत

**✔ सुराज्य/नवी दिल्ली : काँग्रेसच्या माजी पक्षाध्यक्ष व संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधींनी पक्षाच्या रायपूरमधील महाधिवेशनामध्ये सक्रिय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले. 'भारत जोडो यात्रे'ने पक्षाला आणि देशाला निर्णायक वळण दिले आहे. माझ्या राजकीय कारकिर्दीची सांगता या यात्रेने होत असल्याचा मला मनापासून आनंद होत आहे', असे सोनिया गांधी शनिवारी सुमारे १५ हजार कार्यकर्त्यांसमोरील छोटेखानी भाषणात म्हणाल्या.**

दोन दशकांनंतर पक्षाची सूत्रे आता अन्य नेत्यांकडे जात असल्याची कबुली सोनिया गांधींनी भाषणात दिली. सोनिया गांधींच्या भाषणाआधी त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारी चित्रफीत दाखवण्यात आली. त्याचा उल्लेख करून सोनिया गांधी म्हणाल्या की, 'माझे वय झाले आहे, हे मला समजतेय. पक्षाची धुरा सांभाळण्यासाठी आता तरुण पिढी पुढे आलेली आहे.'

## सुरेश नागूर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

# नागूर यांचे समाजसेवेचे कार्य कौतुकास्पद : खा.महास्वामी

✔ सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी हे शहर राज्यातच वैभवशाली शहर आहे, हे शहर कलाकारांची राजधानी आहे. या शहरातील सामाजिक युवा उद्योजक सुरेश नागूर यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील पाच कोटी विविध विकास कामांच्या भूमिपूजना बरोबरच मैंदर्गी शहराचे कायमस्वरूपी पाणी प्रश्न मिटविण्यासाठी पाणीपुरवठा करिता आ.कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून २९ कोटींची निधी मंजुरी करून घेण्याची कला या मैंदर्गी शहरवासीयात दिसून आली आहे. असे गौरव उद्गार खासदार डॉ जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी काढले.**

विनायक लॉजिस्टिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष युवा उद्योजक सुरेश अण्णा नागूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित मैंदर्गी शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला व शहरातील विविध विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी खासदार डॉ जय सिद्धेश्वर महास्वामीजी बोलत होते .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपाचे राष्ट्रीय युवा मोर्चाचे उपाध्यक्ष आमदार राम सातपुते हे होते. शहरातील विविध विकास कामांच्या पाच कोटींची निधी विकास कामाची भूमिपूजन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार दिलीप माने, मैंदर्गी नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, माजी नगराध्यक्ष तुकप्पा नागूर, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, विविध विकास कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष प्रभूदेव बेनीसुर,कुरनूर चे अमर पाटील, नन्नू कोरबु आदींची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामीजी पुढे बोलताना म्हणाले युवा उद्योजक सुरेश नागुर यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमाबरोबरच अध्यात्मिक प्रवचनाच्या माध्यमातून दहा दिवस रोज वीस ते पंचवीस हजार लोकांची व्यवस्था करून अक्कलकोट तालुक्यातच मैंदर्गी शहराचा नावलौकिक केला आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाली आहे त्यांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी व्यक्त केले तसेच शहराच्या विकासासाठी पाच कोटी निधीतून विविध कामे होणार आहेत त्याबरोबरच शहरातील सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळीक साधून मैंदर्गी शहराच्या विकासासाठी २९ कोटींची निधी प्राप्त करून घेण्यासाठी हृदय श्रीमंत की दाखविली आहे.यामुळे शहरात विकास कामाला नवी दिशा मिळाली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. अध्यक्षस्थानी भाषणात बोलताना आमदार रामभाऊ सातपुते म्हणाले की, अक्कलकोट तालुक्याला सचिन कल्याणशेट्टी यांच्या रुपाने विकास पुरुष आमदार भेटले आहेत.त्यांनी विकास पर्व सुरू केले आहे.मैंदर्गीत विकासगंगा आणली आहे असे सांगून, सुरेश नागूर यांनी गोर गरीब माणसाला आपल्या माध्यमातून मदत करत असतात, त्यांनी गोर गरीबांच्या भावना समजून काम करत असतात,ते धडाधडीचे कार्यकर्ता आहे. त्यांच्या पाठीशी आपणं सर्वानी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहोत.येत्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मोठ्या मताधिक्याने निवडून येतील.अक्कलकोट तालुक्यातील विकास व्हायला पाहिजे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,असे आ.सातपुते म्हणाले.

या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविकातून भाजपा तालुका महिला अध्यक्ष सुरेखा होळीकट्टी यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सुरेश नागूर यांच्या पाठीशी राहावे असे आवाहन केले. यावेळी राजमुद्रा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय राज मोरे, किरण पाटील, शिवचलप्पा मुन्नोळी, भाजपा शहराध्यक्ष शिवशरण भरमा, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष दयानंद बमनळळी, अनिल पाटील लक्ष्मीपुत्र निंबाळ, सिद्धाराम जकापुरे, सिद्धाराम पाटील, सिद्धाराम झंगी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते,मैंदर्गी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी शहरातील विविध सामाजिक संस्थेच्यावतीने सुरेश नागूर यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीपुत्र निंबाळ यांनी तर राजेंद्र गायधनकर आभार मानले.

या नागरी सत्कार सोहळ्यास शहरातील महिला बचत गटाच्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सुरेश नागुर हे माझे चांगले मित्र : आ.कल्याणशेट्टी

**मैंदर्गी शहराने मला खूप प्रेम दिले असून या शहरातील युवा उद्योजक सुरेश नागुर हे माझे चांगले मित्र आहेत त्यांनी केलेल्या आजवरच्या सामाजिक कार्याचा मला गौरव आहे यापुढेही त्यांच्या सामाजिक उपक्रमास व वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या पुढील वाटचालीबरोबर येणाऱ्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे साथ राहणार आहे आणि मैंदर्गी शहराच्या विविध विकासासाठी पाच कोटी निधीच्या माध्यमातून भूमिपूजन करण्यात आले. यापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्र ३ कोटी ५० लाख तसेच अंतर्गत रस्त्यांसाठी एक कोटी रुपये शहरातील सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी २९ कोटी निधी मंजूर करून घेणार असल्याचे आश्वासन देऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून आणखी निधी मंजूर करणार असल्याचे ग्वाही अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

### ७००० डस्टबिन वाटप

**सुरेश नागूर यांच्या वाढदिवसानिमित्त मैंदर्गी शहरात मैंदर्गी नगरपालिकेच्या वतीने युवा उद्योजक सुरेश नागुर यांच्या तर्फे माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरातील नागरिकांना ओला व सुका कचरा विलीनीकरण करण्यासाठी ७००० डस्टबिन वाटप करण्यात आले. नगरपालिका सभागृहात नेत्र व मोतीबिंदू तपासणी शिबिर घेण्यात आले या तपासणी शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य विमा कार्डचे वाटप ही करण्यात आले.समाधान शिबीर घेण्यात आला. आदर्श प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत संगणक संच भेट देण्यात आले.**

# श्रद्धा वालकर हत्या प्रकरण : आफताबवरील आरोपांबाबत ७ मार्च रोजी सुनावणी

✔ नवी दिल्ली : श्रद्धा वालकर हत्येप्रकरणातील आरोपी आफताब पूनावाला याच्यावरील आरोपांच्या सुनावणीसाठी दिल्ली न्यायालयाने ७ मार्च ही तारीख शुक्रवारी निश्चित केली. आफताब याने श्रद्धा हिचा गळा दाबून हत्या केल्यानंतर मृतदेहाचे अनेक तुकडे केल्याचा आरोप आहे. आफताब याला न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनिषा खुराना कक्कर यांनी सुनावणीची तारीख निश्चित केली. पोलिसांनी २४ जानेवारी रोजी दाखल केलेल्या सहा हजार ६२९ पानांच्या आरोपपत्राची दखल ७ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने घेतली होती. अफताब (२८) याने त्याची लिव्ह इन पार्टनर' श्रद्धा (२७) हिची १८ मे २०२२ रोजी दिल्लीत हत्या केली होती. तिच्या शरीराचे तुकडे करून फ्रिजमध्ये ठेवले होते.

# बंडखोर मुख्यमंत्र्यांची आत्महत्या



दि. ९ ऑगस्ट २०१६. स्थळ : मुख्यमंत्र्यांचे सरकारी निवासस्थान. त्यांच्या खोलीचा दरवाजा बंद होता. आत ते एकटेच होते. नेहमीप्रमाणे ते रात्री झोपी गेले. सकाळी लवकर त्यांच्या खोलीचा दरवाजाच उघडला गेला नाही. ते मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असल्यामुळे त्याठिकाणी नोकर-चाकरांची कमी नव्हती. सकाळी उशिरापर्यंतही त्यांच्या खोलीचा दरवाजा बंदच होता. आतूनही काही आवाज येत नव्हता. बंगल्यावरच्या नोकरांनी दरवाजा वाजवला. पण आतून काहीच आवाज आला नाही. अनेकवेळा हाका मारल्या. पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी दरवाजा तोडला आणि आतील दृश्य पाहून एकाएकाचे डोळेच पांढरे झाले. काहींना चक्कर आली. काहीजण बेशुध्द पडण्याचेच बाकी राहिले होते. कारण दृश्यच तसे होते. समोर गळफास लावलेल्या अवस्थेत मृतदेह लटकत होता. तो लटकणारा मृतदेह अशा तशा व्यक्तीचा नव्हता तर तो मृतदेह होता मा. मुख्यमंत्र्यांचा.



हो, तो मृतदेह मुख्यमंत्र्यांचाच होता. त्यांनी गळफास घेतला होता. ते होते कलिखो तुकी. आसामचे ८ वे मुख्यमंत्री. मुख्यमंत्रिपदावरून पाय उतार झाल्यानंतर अवघ्या काही दिवसातच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले होते. ते मुख्यमंत्रिपदावरून पाय उतार झालेले असले तरी त्यांनी अद्याप मुख्यमंत्र्यांचा सरकारी बंगला सोडलेला नव्हता. त्यामुळे त्यांनी त्याच सरकारी बंगल्यात गळफास घेऊन स्वत:ची जीवन यात्रा संपवली होती. आज कलिखो तुकी यांची आठवण येण्याचे कारण म्हणजे गेल्या काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सुरू असलेली सुनावणी आणि या सुनावणीदरम्यान चर्चेला आलेले नबाम रेबिया प्रकरण. या नबाम रेबिया प्रकरणाचा आणि मुख्यमंत्र्यांच्या आत्महत्येचा काय संबंध? असाही एक प्रश्न उपस्थित होईल. हे नबाम रेबिया प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने कलिखो तुकी यांचे सरकार बरखास्त केले होते. त्यामुळे तुकी यांना मुख्यमंत्रिपदावरून पाय उतार व्हावे लागले होते आणि त्यातूनच त्यांनी आत्महत्या केली होती.

आता तेच नबाम रेबिया प्रकरण महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत पुन्हा एकदा बाहेर आले आहे. त्यामुळे नबाम रेबिया प्रकरण काय आहे? त्याचा महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाशी काय संबंध आहे? हे समजून घेण्यासाठी आजचा हा लेखन प्रपंच.गेल्या जून महिन्यात जे महाराष्ट्रात घडले होते तेच फेब्रुवारी २०१६ मध्ये अरूणाचलमध्ये घडले होते.जसे महाराष्ट्रात शिवसेनेत बंड झाले; तसेच बंड अरूणाचलमध्ये झाले होते. ज्या प्रमाणे उध्दव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता; तसाच आसामचे मुख्यमंत्री नबाम तुकी यांनाही राजीनामा द्यावा लागला होता. अरूणाचलमध्येही नबाम तुकी यांनी बहुमत चाचणीला तोंड दिले नव्हते. अगदी तसेच, उध्दव ठाकरे यांनीही विश्वासदर्शक ठरावाला सामोरे न जाता राजीनामा दिला. पुढे आसामचे प्रकरण तेथील उच्च न्यायालयमार्गे सर्वोच्च न्यायालयात पोहचले. तसाच प्रकार महाराष्ट्रातही झाला असून सत्तासंघर्षाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचले आहे. आसाम प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने बंडखोरीतून सत्तेवर आलेले सरकार अवैध ठरवले होते. महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सुनावणी अद्याप चालू आहे.

## कुठे माशी शिंकली?

सन २०१४ मध्ये अरुणाचल प्रदेश विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. एकूण ६० जागा असलेल्या अरुणाचल विधानसभेत त्यावेळी तब्बल ४३ जागा जिंकून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला होता. त्यामुळे नबाम तुकी हे मुख्यमंत्री झाले होते. त्यांचे सख्खे भाऊ असणारे नबाम रेबिया यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. सर्वकाही व्यवस्थित चालू होते. पण त्यादरम्यान केंद्रात सत्तेवर असणाऱ्या भाजपने काँग्रेस पक्षातील असंतुष्ट आमदारांना आतून पोकरण्याचे काम सुरू केले होते. मुख्यमंत्री नबाम तुकी यांच्याच मंत्रिमंडळात मंत्री असणारे कलिखो पुली हे भाजपच्या गळाला लागले होते. मुख्यमंत्री तुकी आणि मंत्री पुली यांच्यात संघर्ष सुरू झाला होता. त्यातून मुख्यमंत्री तुकी यांनी काँग्रेसचे वरिष्ठ नेते असणारे कलिखो पुली यांचे मंत्रिपद काढून घेतले. साहजिकच पुली खवळले आणि त्यांनी मुख्यमंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. तेव्हा पुली यांनी पक्षशिस्तीचा भंग केला म्हणून काँग्रेसने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली.




## कलिखो पुली यांचे बंड



काँग्रेसने पक्षातून हकालपट्टी करताच पुली यांनी बंडाचा झेंडा फडकावला. त्यांच्यासोबत काँग्रेसमधले २१ आमदार होते. त्यावेळी राज्यपाल होत्या ज्योती प्रसाद राजखोवा. त्या पूर्वी आसाममध्ये प्रधान सचिव होत्या. त्यांची भाजपने अरूणाचलच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. साहजिकच पुली यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या बंडखोर आमदारांनी राज्यपाल राजखोवा यांची भेट घेतली आणि मुख्यमंत्री नबाम तुकी यांचे सख्खे भाऊ नबाम रेबिया जे त्यावेळी विधानसभा अध्यक्ष होते; त्यांना बदलण्याची मागणी या बंडखोर गटाने केली. त्याचा परिणाम असा झाला की राज्यपालांनी बंडखोरांची मागणी तात्काळ मान्य करून जानेवारी २०१६ मध्ये होणारे नियमित अधिवेशन राज्यपालांनी डिसेंबर २०१५ मध्येच बोलावले.


## विधानसभेला ठोकले कुलूप

विधानसभेचे अधिवेशन हे सरकारच्या सूचनेनुसार राज्यपाल बोलवता. पण इथे राज्यपालांनी अधिवेशन बोलावले. राज्यपालांच्या आदेशानुसार अधिवेशन घेण्यास मुख्यमंत्री नबाम तुकी यांनी नकार दिला. तरीही राज्यपाल आणि बंडखोर गट अधिवेशन घेण्यावर ठाम होते. ते पाहून मुख्यमंत्री तुकी यांनी विधानसभेलाच कुलूप ठोकले. नेमकी हीच संधी साधून भाजपचे ११ व अपक्ष २ अशा१३ आमदारांनी बंडखोर गटाला पाठिंबा दिला. त्यामुळे बंडखोर गटाचे संख्याबळ ३३ झाले. या ३३ आमदारांनी इटानगरमध्येच विधानसभेबाहेर एका कम्युनिटी हॉलमध्ये विधानसभेचे अधिवेशन घेतले. या अधिवेशनात बंडखोर गटाचे नेते कलिखो पुली यांची विधिमंडळाच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. शिवाय विधानसभा अध्यक्ष असणारे नबाम रेबिया यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर करून घेतला. त्यांच्या जागी नवीन विधानसभा अध्यक्षही निवडण्यात आला.



## राष्ट्रपती राजवट लागू

सर्वोच्च न्यायालयात रेबिया प्रकरणावरून घटनापीठाची स्थापना करण्यात आली. रेबिया प्रकरणाची सुनावणी घटनापीठासमोर सुरू होती. त्यातच दि. २५ जानेवारी २०१६ रोजी राज्यपाल राजखोवा यांनी अरूणाचलमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. साहजिकच राष्ट्रपती राजवटीविरुध्द काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. इथे केंद्र सरकारनेही या वादात उडी घेतली. अरूणाचलमध्ये राष्ट्रपती राजवट आवश्यक असल्याची कारणे सांगणारे प्रतिज्ञापत्रच केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले.




### नबाम रेबिया पोहचले कोर्टात



विधानसभेबाहेर घेतलेल्या अधिवेशनात विधानसभा अध्यक्ष नबाम रेबिया यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर होत असताना इकडे रेबिया यांनी काँग्रेसच्या बंडखोर २१ पैकी १४ आमदारांना निलंबित केले. या दोन्ही गोष्टी एकाच दिवशी घडल्या. त्यानंतर लगेचच विधानसभेच्या उपाध्यक्षांनी रेबिया यांचा आदेश रद्द केला. म्हणजेच रेबिया यांनी केलेल्या १४ आमदारांचे निलंबन उपाध्यक्षांनी रद्द केले. त्यावेळी उपाध्यक्ष हे बंडखोर गटात होते. म्हणून निलंबनाचा आदेश काढण्यापूर्वीच काँग्रेसने उपाध्यक्षांवरच अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. साहजिकच उपाध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयाच्याविरोधात नबाम रेबिया हे गुवाहाटी हायकोर्टात गेले. दि.५ जानेवारी २०१५ रोजी गुवाहाटी कोर्टाने विधानसभेच्या उपाध्यक्षांनी घेतलेल्या निर्णय कायम करत काँग्रेसच्या १४ आमदारांचे निलंबन स्थगित केले. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या विरोधात नबाम रेबिया सर्वोच्च न्यायालयात गेले.

### सत्तांतर झाले अन् कलिखो मुख्यमंत्री बनले



दुसऱ्या बाजूला भाजपच्या पाठिंब्यावर बंडखोर कलिखो पुल हे सत्ता स्थापन करण्याच्या तयारीत होते. तशा हालचाली सुरू झाल्या होत्या. हे लक्षात येताच काँग्रेसने आणखी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. कलिखो यांना राज्यपालांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ देऊ नये, अशी मागणी काँग्रेसने या याचिकेद्वारे केली होती. मात्र राज्यपालांनी कोणाला मुख्यमंत्री म्हणून शपथ द्यावी, हा राज्यपालांचा अधिकार आहे, असे स्पष्ट करून काँग्रेसची मागणी फेटाळली. त्यानंतर लगेचच केंद्र सरकारने अरूणाचलमधील राष्ट्रपती राजवट उठवली आणि भाजपचे ११, इतर २ आणि काँग्रेसचे बंडखोर २१ आमदारांच्या पाठिंब्यावर कलिखो पुल यांनी मुख्यमंत्री होऊन अरूणाचलमध्ये सत्तास्थापन केली. तो दिवस होता १९ फेब्रुवारी २०१६.

### दि. १३ जुलै २०१६ : ऐतिहासिक निर्णय



अरूणाचलमध्ये इकडे कलिखो मुख्यमंत्री झाले. तिकडे सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठापुढे सुनावणी चालूच होती. संपूर्ण सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणी झाली. विधानसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष, राज्यपाल यांनी घेतलेले निर्णय, राज्यपालांचे अधिकार व कक्षा यांचा या सुनावणीत कायद्याच्या कसोटीवर कीस पाडण्यात आला. त्यानंतर दि. १३ जुलै २०१६ रोजी घटनापीठाने राज्यपालांचे कृती असंविधानिक असल्याचे स्पष्ट करत पाय उतार झालेले नबाम तुकी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार पुनर्स्थापित करण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला.

### हाच महाराष्ट्रातील बंडाला आधार



सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने कलिखो सरकार बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट केलेच. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा निर्णयसुध्दा दिला. 'जर विधानसभा उपाध्यक्षांवर अविश्वास प्रस्ताव दाखल असेल तर बंडखोर आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार उपाध्यक्षांना नाही', असा तो निर्णय होता. याच निर्णयाचा फायदा घेऊन महाराष्ट्रातील शिवसेनेच्या बंडखोर आमदारांनी गुवाहाटीतून ईमेलद्वारे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यावर अविश्वास प्रस्ताव दाखल केला. हा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे शिवसेनेने बंडखोर आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी दाखल केलेली याचिका सुनावणीसाठी उपाध्यक्ष झिरवळ यांच्यासमोर आली. साहजिकच नबाम रेबिया प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्णयाचा आधार महाराष्ट्रातल्या शिवसेनेच्या बंडखोर आमदारांनी घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या सुनावणीवेळी रेबिया प्रकरण चर्चेत आले.

### तुकी बनले चार दिन का सीएम



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कलिखो पुली यांचे सरकार गेले. नबाम तुकी पुन्हा मुख्यमंत्री झाले. कायद्याच्या चौकटीत तुकी आणि काँग्रेसचा विजय झाला होता. पण बंडखोर आमदारांचे बंड काही शमले नव्हते. त्यामुळे साहजिकच जे व्हायचे तेच झाले. तुकी मुख्यमंत्री बनले. पण त्यांना बहुमत नव्हते. म्हणून चौथ्याच दिवशी त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर त्यांच्याकडे असलेले आमदारही बंडखोर गटात सामील झाले.

### दोघांच्या भांडणात खंडू झाले मुख्यमंत्री



न्यायालयाच्या आदेशानुसार मुख्यमंत्री झालेले तुकी हे चार दिन के सीएम ठरले. सत्तेतून पाय उतार झालेले बंडखोर गटाचे नेते कलिखो पुली यांनी मुख्यमंत्रिपद सोडताच मुख्यमंत्र्यांच्याच बंगल्यात आत्महत्या केली. तुकी आणि पुली यांच्या भांडणात दोघांचेही मुख्यमंत्रिपद गेले. पुली यांनी तर जगही सोडले. त्यामुळे साहजिकच बंडखोर गटातीलच काँग्रेसचे आमदार पेमा खंडू पुढे आले. त्यांनी त्यांच्यासह उर्वरित काँग्रेसच्या ४१ आमदारांचा गटच भाजपचा मित्रपक्ष असलेल्या पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचल म्हणजे पीपीए या पक्षामध्ये विलीन केला. त्यामुळे ते पक्षांतर बंदी कायद्यातून वाचले आणि मुख्यमंत्री पदावर राहिले.

### सर्वोच्च न्यायालयात पुन्हा तेच

ज्या नबाम रेबिया प्रकरणाचा वारंवार उल्लेख सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत येत आहे, त्याच रेबिया प्रकरणाचा आधार घेऊन भाजपने महाराष्ट्रातही सत्तांतर घडवून आणले आहे. अरूणाचलमध्ये काँग्रेसचे आमदार फोडले होते; महाराष्ट्रामध्ये शिवसेनेचे आमदार फोडले आहेत. अरूणाचलमध्येही भाजपने नेमलेले भाजपधार्जिणे राज्यपाल होत. महाराष्ट्रातही भाजपधार्जिणे कोश्यारी राज्यपाल होते. अरूणाचलमध्ये जे झाले; तेच जसेच्या तसे महाराष्ट्रात झाले. महाराष्ट्राचाही सत्तासंघर्ष सर्वोच्च न्यायालयात पोहचला आहे. सध्या सुनावणी सुरू आहे. जो पेच अरूणाचलच्या बाबतीत निर्माण झाला होता; तोच घटनात्मक पेच महाराष्ट्राच्याबाबतीतही झाला आहे. आता प्रतीक्षा आहे ती घटनापीठाच्या निकालाची. जोही निर्णय येईल, तो ऐतिहासिक असेल. भारतीय राज्यघटनेचा नव्याने अर्थ लावणार निर्णय असेल. महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे लक्ष आता सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाकडे लागले आहे.



संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे